# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ०९ मार्च, २०१८ / फाल्गुन १८, १९३९ ( शके )**

**(१) वित्त व नियोजन, वने मंत्री**
**(२) ग्रामविकास, महिला व बालविकास मंत्री**
**(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**
**(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**
**(५) जलसंधारण, राजशिष्टाचार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री**
**(६) रोजगार हमी, पर्यटन मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६८**

---

### उस्मानाबाद जिल्हयातील मौजे येरमाळा (ता.कळंब) व मौजे तामलवाडी (ता.तुळजापूर) येथे ट्रॉमा केअर सेंटर सुरु करण्याबाबत

**(१) * १०८२१३ श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यात मौजे येरमाळा (ता.कळंब) व मौजे तामलवाडी (ता.तुळजापूर) ही मोठी गावे राज्य महामार्गावर असून या गावांपासून जवळपास ६० ते ७० कि.मी. अंतरावर कोठेही जिल्हा आरोग्य केंद्र नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ठिकाणी ट्रॉमा केअर सेंटर सुरु करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने मौजे येरमाळा (ता.कळंब) व मौजे तामलवाडी (ता.तुळजापूर) येथे ट्रॉमा केअर सेंटर सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) येरमाळा व तामलवाडी येथे ट्रॉमा केअर सेंटरची मागणी निकषानुसार बृहत आराखडयात समाविष्ट करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) येथील भातसा धरणाच्या उजव्या कालव्याची देखभाल व दुरुस्तीअभावी झालेली दुरवस्था

**(२) * १०८९४८ श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि. ठाणे) येथील भातसा धरणाच्या उजव्या कालव्याची देखभाल व दुरुस्तीअभावी अनेक ठिकाणी पडझड झाली असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी जलसंपदा विभागाला वारंवार कळवूनही विभागाने कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कालव्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार सदर कालव्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) श्री. पांडुरंग महादू बरोरा, विधानसभा सदस्य, शहापूर यांनी दि. २४/०७/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, भातसा धरण व्यवस्थापन विभाग, भातसानगर यांचेकडे गणेशवाडी-बेंदवड-तांबडमाळ येथील भातसा उजवा कालव्याच्या कार्यक्षेत्रामधील पूल ना-दुरुस्त असल्याने नविन पूल मंजूरीची मागणी केली आहे.

आस्तित्वातील पुलाच्या दुरुस्तीच्या कामाची निविदा कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(२) होय, धरणाच्या उजव्या कालव्याची पाहणी क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी केली आहे. उजवा तीर कालव्याची काही ठिकाणी दुरुस्ती तसेच पुलाची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे आढळून आले आहे.

(३) १) उजव्या कालव्याच्या ० ते ५४ कि.मी. मधील आवश्यक ठिकाणी भरावाची व देखभाल दुरुस्ती कामांची निविदा कार्यवाही प्रगती-पथावर आहे.

२) पाखरण कार्यक्रमांतर्गत यांत्रिकी विभागाकडून कालव्याचे सेवा पथाचे गवत काढण्याचे काम २७ कि.मी. पर्यंत पूर्ण करण्यात आले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बाळगंगा (ता.पेण, जि.रायगड) धरणातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत

**(३) * १०६४३२ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाळगंगा (ता.पेण, जि.रायगड) धरण प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या सहा ग्रामपंचायतीमधील ९ गावे व १३ वाड्या मिळून ३४४२ बाधित कुटुंबांपैकी ६०

टक्के कातकरी व ठाकूर आदिवासी समाजातील प्रकल्पग्रस्तांना देय असलेला लाभ तातडीने मिळावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.महसूल मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच बाळगंगा धरणाचे काम पूर्ण होत आले तरीही पेण (जि.रायगड) तालुक्यातील वरसई, निधवली व परिसरातील प्रकल्पग्रस्तांचे अद्यापही पुनर्वसन झालेले नसल्याने येथील प्रकल्पग्रस्तांनी योग्य मोबदला, पुनर्वसन व इतर मागण्यांसाठी मुंबई-गोवा महामार्गावर खरोशी फाटा येथे दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास रास्ता रोको आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पासाठी भूसंपादनाची अधिसूचना काढून आठ वर्षाचा कालावधी होऊनसुध्दा शासनाकडून कोणतीच कार्यवाही झाली नसल्यामुळे शेतकरी शेतीच्या कामापासून वंचित राहीला असून या प्रकल्पग्रस्त गावातील सर्व मुलभूत सुविधा व आदिवासी विभागाकडून राबविल्या जाणाऱ्या विकास योजना बंद झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उक्त प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) प्रकल्पग्रस्तांच्या भूसंपादन व पुनर्वसनाबाबत जिल्हाधिकारी रायगड यांनी प्रकल्पग्रस्तांच्या मागणी संदर्भात संबंधीत यंत्रणाना अंमलबजावणी करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), उपविभागीय अधिकारी पेण, तहसिलदार पेण यांनी धरणग्रस्तांसमवेत आंदोलनाच्या ठिकाणी जाऊन त्यांच्या मागण्यासंदर्भात चर्चा करून त्यांच्या मागण्यांचे निरसन केले. प्रकल्पग्रस्तांच्या घरांचे/बांधकामाचे फेरमुल्यांकनाचे काम पुर्ण झाले आहे. प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी गागोदे खुर्द, निधवली, आंबेघर, वाशिवली व वरसई या ५ गावांतील भूसंपादन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या (ता.पारशिवनी, जि.नागपूर) कालव्याच्या कडेला संरक्षक भिंत बांधण्याबाबत**

**(४) * १०५६९३ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेंच व्याघ्र प्रकल्प (ता.पारशिवनी, जि.नागपूर) येथे दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास दुचाकीवरुन जाताना दुचाकी घसरुन अनियंत्रित झाल्याने दुचाकीवरील तिघेजण थेट पेंच प्रकल्पाच्या कालव्यात पडले त्यांना वाचविण्यासाठी गेलेली दुसरी व्यक्तीही पाण्यात वाहून जाऊन त्या चौघांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार कालव्याच्या पाण्याचा वेग लक्षात घेता कालव्याच्या कडेला संरक्षक भिंत उभारण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

दि.२१.१२.२०१७ रोजी सदर घटना घडली असून त्यात चार व्यक्तींचा मृत्यु झाला.

तथापि सदर घटनास्थळ पेंच प्रकल्पाच्या डावा मुख्य कालव्याचे सा.क्र.५८६५ मी. चे सेवापथावरील असून हा भाग पेंच व्याघ्र प्रकल्पाचे भागात येत नाही.

(२) होय.

या प्रकरणाची चौकशी पोलीस निरीक्षक पारशिवनी जिल्हा नागपूर यांचेकडून करण्यात येत आहे.

(३) पेंच प्रकल्पाच्या डावा मुख्य कालव्याची लांबी ३२.८५ कि.मी असून त्याची विसर्ग वहन क्षमता ९० घ.मी./सेकंद आहे. घटनेच्या वेळी डाव्या मुख्य कालव्यातून रब्बी हंगामातील सिंचनाकरीता २२.६५ घ.मी./सेकंद विसर्ग सुरू होता. त्या ठिकाणी पाण्याची खोली १.४० मी. होती. डावा मुख्य कालव्याच्या सेवापथाच्या कडेला संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे तांत्रिक योग्य नाही. सेवापथावरून खाजगी वाहनांचे आवागमन वर्जित आहे. पर्यायाने कालव्याच्या कडेला संरक्षक भिंत उभारणे अपेक्षित नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या मिशन धन्वंतरी योजनेबाबत

**(५) * १०५८१८ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य या कार्यक्रमांतर्गत वैद्यकीय उपचार करण्यासाठी आर्थिक परिस्थिती नसणाऱ्या पालकांच्या बालकांसाठी मिशन धन्वंतरी योजना सुरु केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेच्या माध्यमातून फक्त एकाच मुलाची शस्त्रक्रिया झाली असून अजून ४७ मुलांची शस्त्रक्रिया झाली नसल्याने मुलांच्या शस्त्रक्रियेसाठी त्यांचे पालक विविध खासगी, सरकारी आणि धर्मादाय रुग्णालयांकडे सतत पाठपुरावा करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मुलांच्या शस्त्रक्रिया करण्यासह कामांमध्ये दिरंगाई करणाऱ्या संबधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

धन्वंतरी योजना माहे ऑक्टोबर, २०१६ ते मार्च, २०१७ या कालावधीमध्ये राबविण्यात आली. त्याअंतर्गत २४ बालकांवर यशस्वी शस्त्रक्रीया करण्यात आल्या असून उर्वरीत २४ शस्त्रक्रीया हया, बालकांची तब्येत अत्यंत नाजूक असणे, त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सूरू असणे बालकांचे पालक शस्त्रक्रीयेसाठी तयार नसणे, या कारणांमुळे प्रलंबित आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वरळी (मुंबई) येथील राज्य कामगार विमा योजना रुग्णालयात आय.सी.यु. स्थापन करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(६) * १०४८०४ श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी (मुंबई) येथील राज्य कामगार विमा योजना रुग्णालयात नवीन आय.सी.यु. करीता लागणारे मनुष्यबळ व यंत्रसामुग्री यासाठी सुमारे २१ कोटी रुपयांची आवश्यकता असून याबाबतचा प्रस्ताव रुग्णालयाने माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य कामगार विमा योजना रुग्णालयात नवीन आय.सी.यु. साठी लागणारे मनुष्यबळ व यंत्रसामुग्री उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशतः खरे आहे.

राज्य कामगार विमा योजना रुग्णालय वरळी येथे आय.सी.यु. स्थापन करणे संदर्भात रुग्णालयांकडून Civil व Electrical ची कामे, अतिरिक्त १०२ नवीन पदांची निर्मीती, ४८ नवीन वैद्यकीय उपकरणे व १ नवीन रुग्णवाहिकाची

खरेदी व Additional Blood Storage Unit स्थापित करणे या एकूण ०५ बाबींकरीता वेगवेगळे प्रस्ताव आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, मुंबई या कार्यालयाकडे पाठविण्यात आलेले आहेत.

(२) उपरोक्त ५ बाबींपैकी Civil कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत प्राप्त रु.२८,७१,३४६/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक दिनांक २३.०२.२०१८ अन्वये शासनास प्राप्त झाले असून शासन स्तरावर कारवाई सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक विभागातील जलयुक्त शिवार योजनेच्या कामांबाबत

**(७) * १०६०२८ श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या जलयुक्त शिवार योजनेच्या सन २०१६-१७ च्या आराखडयानुसार निश्चित केलेले भौतिक आणि आर्थिक लक्ष दुसऱ्या वर्षीही साध्य करण्यात नाशिक विभागाला अपयश आल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार नाशिक विभागात जलयुक्त शिवार योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील अंगणवाड्यातील मुलांना पूरक आहार पुरविणाऱ्या महिला बचत गटांची देयके थकविल्याबाबत

**(८) * १०९३९१ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील ३ हजार १८३ अंगणवाड्यातील ६ वर्षाखालील मुलांना पूरक आहार पुरविणाऱ्या महिला बचत गटांची देयके एकात्मिक बालविकास यंत्रणेने मागील नऊ महिन्यांपासून थकविल्याप्रकरणी येथील कष्टकरी संघटनेने दिनांक १६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास पालघर जिल्हा परिषदेवर मोर्चा काढून आंदोलन केले व यासंदर्भातील मागण्यांचे निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी, पालघर जिल्हा परिषद यांचेकडे दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, पालघर जिल्हा परिषद यांना सादर केलेल्या मागण्यांचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, त्यानुसार महिला बचत गटांची देयके अदा करण्यासह प्रतिकुल परिस्थितीत काम करणाऱ्या महिला बचत गटांच्या समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) कष्टकरी संघटना, पालघर यांचेकडील निवेदनामधील मागण्यांमध्ये आहार पुरविणा-या बचतगटांची थकीत बिले / मानधन अदा करणेत यावी व बचतगटाच्या आर्थिक व्यवहारात पारदर्शकतेचा अवलंब करणेत यावा असे स्वरुप आहे.

(३) महिला बचतगटांची देयके अदा करण्यासाठी माहे जानेवारी, २०१८ मध्ये ७.५९ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपरकणे व म्हाळांदेवी (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील जलसेतूची कामे पूर्ण करण्याबाबत

**(९) * १०७०८२ श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरकणे व म्हाळांदेवी (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील जलसेतूची अपूर्ण कामे पूर्ण करण्याची मागणी मा.जलसंपदा मंत्री यांचेकडे अकोले येथील लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अकोले येथील लोकप्रतिनिधी श्री. वैभवराव मधुकरराव पिचड, वि.स.स. यांनी मा. मंत्री (जलसंपदा) यांना दिनांक १५/१/२०१८ रोजी सादर केलेले निवेदन कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना दिनांक ७/२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आले आहे.

(२) १) राजुर पिंपरकणे उच्च तलांक पूल-निळवंडे-२ धरणाचे बुडीत क्षेत्रातील राजुर पिंपरकणे रस्त्यासाठी प्रवरा नदीवरील उच्च तलांक पुलाचे काम प्रगतीत आहे. पुलाचे ४९ टक्के काम पूर्ण झाले असून जानेवारी, २०१८ अखेर रु.१७८१.१३ लक्ष खर्च झाला आहे.

२) म्हाळादेवी जलसेतू-उर्ध्व प्रवरा उजवा कालवा सा.क्र.६७५ मी. येथील प्रवरा नदीवरील जलसेतूचे ५० टक्के काम पूर्ण झाले असून माहे जानेवारी, २०१८ अखेर रु.१२९२.२८ लक्ष खर्च झाला आहे.

सदरील प्रकल्पासाठी (निळवंडे-२) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात रु.४६.६० कोटी इतका निधी उपलब्ध करण्यात आला असून कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रुकडी ते माणगांव व नरंदे ते नरंदे फाटा (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) या रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(१०) * १११४९४ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रुकडी ते माणगांव (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) या रस्त्यावर अनेक खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे छोटे-मोठे अनेक अपघात होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच नरंदे ते नरंदे फाटा (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) या रस्त्यावरसुद्धा मोठ्या प्रमाणात खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे अपघात होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही रस्त्यांची शासनाने पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार या दोन्ही रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

कि.मी.०/००० ते ३/५०० मध्ये किरकोळ प्रमाणात रस्त्याची दुरावस्था झाली होती. तथापि, सदर रस्त्याची दुरूस्ती करून रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवलेला आहे. अपघाताची नोंद निरंक आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

नरंदे ते नरंदे फाटा या रस्त्याची एकूण लांबी १९.४० कि.मी. इतकी आहे. त्यापैकी साखळी क्र.१६/८०० ते १९/४०० ही लांबी खराब आहे.तथापि, अपघाताची नोंद निरंक आहे.

(३) सदर दोन्ही रस्त्यांपैकी रूकडी ते माणगांव ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर या रस्त्याच्या ०/००० ते ३/५०० या ३.५०० कि.मी. लांबीची पाहणी कार्यकारी अभियंता, प्रमंग्रासयो, कोल्हापूर यांनी केलेली आहे.

नरंदे ते नरंदे फाटा या रस्त्याची पाहणी कार्यकारी अभियंता (बांधकाम), जि.प.कोल्हापूर यांनी दि.१२.०१.२०१८ रोजी केली आहे.

(४) रूकडी ते माणगांव ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर हा रस्ता प्र.रा.मा.क्र.६ पासून (अतिग्रे) रूकडी माणगाव रूई प्रजिमा क्र. २१ ला मिळणारा रस्ता इजिमा क्र. ३४ असा नमूद आहे. रस्त्याच्या एकूण लांबी १९.४०० कि.मी.पैकी सा.क्र.०/००० ते ३/५०० कि.मी. इतक्या लांबीचा रस्ता प्रधानमंत्री ग्रामसडक योजना कोल्हापूर या विभागाने केलेला आहे. सदर रस्ता किरकोळ खराब झाला होता. तथापि, दुरूस्ती करण्यात आलेली आहे. सध्या रस्ता सुस्थितीत आहे.

नरंदे ते नरंदे फाटा हा रस्ता वाठार तर्फ वडगांव भादोले लाटवडे भेंडवडे खोचीवाठार तर्फे उदगांव नरंदे ते रा.मा.१९२ ला मिळणारा इजिमा २८ असा नमूद असून त्याची एकूण लांबी १९.४०० कि.मी. इतकी आहे. नरंदे ते नरंदे फाटा साखळी क्र.१६/८०० ते १९/४०० ही लांबी खराब असून दुरूस्तीसाठी रक्कम रू.४०.०० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने कामे प्रस्तावीत करण्याचे जिल्हा परिषदेचे प्रयत्न आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हयातील वाघ धरणाच्या पाटांचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(११) * ११३६४२ श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयात शासनाच्या लघु पाटबंधारे स्थानिक स्तर विभागाकडून सन १९९४-९५ मध्ये वाघ नदीवर पळसपाड्याजवळ कोट्यवधी रुपये खर्च करुन मोठे धरण बांधण्यात आले परंतु धरणाच्या पाटांचे काम अर्धवट केल्यामुळे मोखाड्यातील गावे व पाडे अजूनही पाण्यापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणाची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार मोखाडा गावात व आजूबाजूच्या पाड्यांना पाणी मिळण्यासाठी धरणाच्या पाटांचे काम तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

वाघ नदीवर पळसपाड्याजवळ नसून वीसपाड्याजवळ वाघ लघु पाटबंधारे या राज्यस्तरीय योजनेचे काम प्रगतीपथावर असून धरणाचे काम पूर्ण झाले आहे.

योजनेचा डावा कालवा पूर्ण असून उजवा कालवा ९० टक्के पूर्ण आहे. उजव्या कालव्यावर साखळी क्रमांक ७८९२ ते साखळी क्रमांक ८६९० यास ग्रामस्थांनी विरोध केल्यामुळे त्या भागातील पर्यायी संरेखेवरील कालव्याचे काम प्रगतीपथावर आहे. सद्यस्थितीत ५१० हेक्टर सिंचनक्षेत्रापैकी महत्तम १५६ हेक्टर प्रत्यक्ष सिंचन झालेले आहे. सदरचा प्रकल्प हा जून २०१८ पर्यंत निधी उपलब्धतेनुसार पूर्ण करून मोखाडा तालुक्यातील सर्व क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे नियोजित आहे.

(२) प्रकल्पाच्या कालव्याची उर्वरित कामे प्रगतीपथावर असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

(३) ही पाणी पुरवठा योजना नाही. तथापि प्रकल्प अहवालातील तरतुदीनुसार पिण्यासाठी ०.१७३ दक्षलक्ष घन मीटर पाणी राखीव ठेवण्यात आले आहे. अद्याप पिण्याच्या किंवा औद्योगिक वापरासाठी पाण्याची मागणी आलेली नाही.

सदर प्रकल्प हा जुन, २०१८ पर्यंत निधी उपलब्धतेनुसार पूर्ण करून मोखाडा तालुक्यातील सर्व क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नळगंगा (जि.बुलढाणा) प्रकल्पातील पाण्याचे नियोजन करण्याबाबत

**(१२) * १०७१४८ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील नळगंगा प्रकल्पात पाणी साठा असतानाही पाटबंधारे विभागाने पाणीवाटप संस्थांना द्यावयाचे पाण्याचे नियोजन न केल्यामुळे या प्रकल्पावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांचे रब्बी पिक धोक्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान करणाऱ्या पाटबंधारे विभागातील संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह नळगंगा प्रकल्पातील पाण्याचे नियोजन करुन शेतकऱ्यांना पाणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

नळगंगा प्रकल्पात १५/१०/२०१७ रोजी २८.७३ द.ल.घ.मी. (४१.४४ टक्के) पाणीसाठा उपलब्ध झालेला होता. जिल्हा पाणी आरक्षण समितीने मंजूर केलेले २.९२ द.ल.घ.मी. बिगर सिंचन पाणी आरक्षण वगळुन दि.०९/११/२०१७ रोजी नळगंगा प्रकल्पावरील ३२ पाणी वापर संस्थांच्या पदाधिकाऱ्यां समवेत रब्बी हंगाम २०१७-१८ करीता बैठक घेऊन सिंचनाचे नियोजन करण्यात आले असून त्यानुसार सिंचन कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामसडक योजनेंतर्गत मंजुर कामे प्रलंबित असल्याबाबत

**(१३) * ११२००५ श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.राजेश काशीवार (साकोली), डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात सन २०१५ पासुन मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजुर झालेल्या २०० कोटींचे कामांपैकी फक्त ४ कोटींची कामे पूर्ण झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, सदर कामे अपूर्ण ठेवणाऱ्या दोषींवर कारवाई करण्यासह काम तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) खरे नाही.

(२) होय, जिल्ह्यातील रस्त्यांच्या कामांच्या निविदांना पुरेसा प्रतिसाद नसल्यामुळे कामे विलंबाने सुरु झाली आहेत. त्यामुळे खर्चाची टक्केवारी कमी असल्याचे चौकशीमध्ये आढळले. माहे जानेवारी २०१८ पर्यंत रू. १३.८० कोटी खर्च झाला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) नक्षलग्रस्त व दुर्गम क्षेत्र असल्याने कामाच्या गतीवर मर्यादा आहेत. तथापि कामे तातडीने पूर्ण करण्याकरीता आवश्यक ती उपाययोजना करण्यात येत आहे.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील २९ सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याबाबत

**(१४) * १०६५०४ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील २९ सिंचन प्रकल्पांचा समावेश बळीराजा जलसंजीवनी योजनेत करण्यात आला असला तरी शासनाच्या दुर्लक्षामुळे या प्रकल्पांच्या खर्चात तीन ते चारपट वाढ झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त २९ सिंचन प्रकल्प त्वरीत पुर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) बळीराजा जलसंजीवनी योजनेत अमरावती जिल्ह्यातील ५ मध्यम प्रकल्प व १८ लघु पाटबंधारे प्रकल्प अशा एकूण २३ प्रकल्पांचा समावेश आहे.

या प्रकल्पांच्या किंमतीत सर्वसाधारणपणे दुपटीने वाढ झाली असून ती मुख्यत्वे नविन भूसंपादन अधिनियम २०१३ लागू झाल्यामुळे भूसंपादनाच्या किंमतीत झालेल्या वाढीमुळे आहे. याशिवाय पुनर्वसन, वनजमिनीचे संपादन, पर्यावरण मान्यता, प्रकल्पग्रस्तांचा विरोध, प्रकल्प घटकांच्या किंमतीतील वाढ इत्यादी कारणामुळे देखिल किंमतीत वाढ झाली आहे.

(२) या योजनेतील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्रीय अर्थसहाय्य मिळणेसाठी पाठपुरावा सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पूर्व विदर्भातील माजी मालगुजारी तलावांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१५) * ११२७१९ ॲड.संजय धोटे (राजूरा)** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्व विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातील ६ हजार ८६३ माजी मालगुजारी तलावांसाठी निधी न मिळाल्याने पुनर्विकासांची कामे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार पूर्व विदर्भातील माजी मालगुजारी तलावांच्या पुनर्विकासासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) सन २०१६-१७ मध्ये रु.१२१ कोटी व २०१७-१८ मध्ये रु.४० कोटी असे रु.१६१ कोटी चे वितरण करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पर्यटन स्थळांमध्ये सोईसुविधा करण्याबाबत

**(१६) * १०७३३३ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील राधानगरी धरण, राधानगरी गवा अभयारण्य, काळम्मावाडी धरण, वर्षा पर्यटनासाठी प्रसिध्द असणारा राऊतवाडी धबधबा आदि ठिकाण पर्यटनाच्या सोईसुविधांपासून वंचित असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पर्यटन स्थळांची शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, तद्‌नुसार सदर पर्यटन स्थळांमध्ये सोईसुविधा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) नाही. कोल्हापूर जिल्ह्याच्या पर्यटन विकास आराखड्यामध्ये राधानगरी धरण, काळम्मावाडी धरण,दाजीपूर येथे पर्यटक निवास व्यवस्था इत्यादी कामांचा समावेश असून हा आराखडा शासनाच्या विचाराधीन आहे. तसेच जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सन २०१७-२०१८ मध्ये रू.५६.०४ लक्षची ३ कामे मंजूर करण्यात आली आहेत. तर निसर्ग पर्यटन योजनेतून रू.५३.७५ लक्षच्या विविध कामांना मंजुरी देण्यात आली आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नीरा (ता.माळशिरस, जि.सोलापूर) नदीवरील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यांचे अनेक दरवाजे तुटल्याबाबत

**(१७) * १११६१२ श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नीरा (ता.माळशिरस, जि.सोलापूर) नदीवरील सर्व कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यांचे अनेक दरवाजे तुटल्याने बंधाऱ्यातील ५० टक्के पाणी वाहून गेल्याने माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे वारंवार तक्रार करुनही याबाबत कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार नीरा नदीवरील कोल्हापूरी बंधाऱ्यांचे नवीन दरवाजे बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) निरा नदीवरील एकूण ८ कोल्हापूर पध्दतीचा बंधाऱ्यांपैकी माहे सप्टेंबर ते नोव्हेंबर २०१७ दरम्यान ४ को.प.बंधाऱ्याकरीता यांत्रिकी संघटनेकडून एकूण ६४६ नवीन निडल्स प्राप्त करुन बसविण्यात आल्या व आवश्यक पाणीसाठा करण्यात आला आहे. तसेच एका को.प.बंधाऱ्यामधील नादुरुस्त निडल्सची दुरुस्ती करुन आवश्यक पाणीसाठा करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हा परिषदेकडे असलेल्या रस्त्यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी निधी मिळण्याबाबत

**(१८) * १०५३०३ श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील एकूण १९००० कि.मी रस्त्याच्या लांबीपैकी १२५०० कि.मी लांबीचे रस्ते पुणे जिल्हा परिषदेकडे देखभाल व दुरुस्तीसाठी असून सदर रस्त्यांसाठी शासनाकडून जिल्हा परिषदेला प्रतिवर्षी रुपये २०० कोटी रुपयांचा निधी मिळणे आवश्यक असताना प्रत्यक्षात मात्र रस्ते दुरुस्ती, नुतनीकरण व देखभालसाठी केवळ ५७ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाची शुल्लक साधने व त्यापासून जिल्हा परिषदेला मिळणारे अत्यल्प उत्पन्न विचारात घेता ९० टक्के ग्रामीण रस्त्याच्या देखभाल व दुरुस्तीचा आर्थिक ताण जिल्हा परिषदेवर पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार जिल्हा परिषदेला इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग यांच्या दुरुस्ती, नुतनीकरण व देखभालीसाठी वाढीव निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) अंशत खरे आहे.
(३) संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार एकूण लांबी २,३६,८९०.०५ कि.मी. इतकी असून अस्तित्वातील लांबी २,०३,९९७.०० कि.मी. इतकी आहे. पुणे जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी १२,४७८.२० कि.मी. इतकी असून अस्तित्वातील लांबी १२,४७८.०० कि.मी. आहे.

सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या व मानव विकास निर्देशकाच्या प्रमाणात करण्यात येते.

रस्ते व पूल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम तसेच जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी पुणे जिल्हा परिषदेस सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी रु.७५.६५ कोटी व सन २०१७-१८ करीता रु. ६२.८४ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील उजनी डाव्या कालव्यावरील पुलाचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(१९) * ११२२०६ श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील उजनी डावा कालवा कि.मी. ४७ व कि.मी. २६ येथील रस्ता व पुल बांधणेसाठी पाटबंधारे विभागाने सन २०१४-१५ मध्ये मंजुरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यावरील कि.मी. ४७ मधील पुलाचे काम अंशत: सुरु करून बंद करण्यात आल्याचे तसेच कि.मी. २६ मधील पुलाचे काम चार वर्षापासून सुरु झालेले नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार उक्त ठिकाणच्या रस्ते व पुलाचे काम विहीत मुदतीत पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) होय.

ठेकेदाराने सा.क्र.४६/९०० येथील पुलाचे कामातील अंत्यांधर व प्रस्तंभ संधानकाचे काम केले असुन स्लॅबचे काम केले नाही. तसेच कि.मी. २६ मधील पूलाचे काम चालू केले नाही.
(३) व (४) ठेकेदारास काम सुरू करून कामाची गती राखणेबाबत वेळोवेळी विभागाने पत्रव्यवहार केला आहे. परंतु ठेकेदाराकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यामुळे, निविदा शर्तीनुसार कार्यवाही करण्यात येत आहे. शासनाच्या प्रचलित नियमानुसार सदरच्या कामाची निविदा नव्याने निश्चित करून काम हाती घेण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहर, पाचगाव पर्वती, वारजे व बावधन या वनक्षेत्राच्या सीमाभिंतीचे कामात झालेला गैरव्यवहार

**(२०) * १०५०५८ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहर, पाचगाव पर्वती, वारजे, बावधन या वनक्षेत्राभोवती राखीव वनांचे संरक्षण करण्याकरिता शासनाकडून प्राप्त रुपये १६२२.७१ लक्ष अनुदानाच्या कामातील २०.८३३ कि.मी. लांबीच्या सीमाभिंतीचे कामात गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गावाच्या वनक्षेत्राभोवती राखीव वनांचे संरक्षण व अतिक्रमण रोखण्यासाठी शासनाकडून प्राप्त रुपये १६२२.७१ लक्ष अनुदानातून झालेल्या सीमाभिंतीच्या कामाची निविदाप्रक्रिया, कंत्राटदारास देयके अदा

केल्याचा तपशील व कामांचे अंदाजपत्रक इत्यादी माहिती देण्यास संबंधित विभाग दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीमध्ये काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) पुणे वन विभागातील वनक्षेत्राच्या संरक्षणासाठी राखीव वनाभोवती सुमारे ५१८१ मी. लांबीची संरक्षण भिंत बांधण्याकरिता सन २०१६-१७ मध्ये विभागाकडून योजनेअंतर्गत रु. ३७७.३८ लक्ष तसेच राज्य कॅम्पांतर्गत रु. ९४.९६ लक्ष असे एकूण रु. ४७२.३४ लक्ष निधी वितरीत करण्यात आला होता. सदर वितरीत निधीतून संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्यात आले आहे. प्रकरणी कोणताही आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ वा त्यासुमारास निदर्शनास आले नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) मौजे बावधान येथे वनक्षेत्राची मोजणी न करता वन हद्दीच्या आत संरक्षक भिंत बांधल्याचे निदर्शनास आल्याने तसेच मौजे म्हाळुंगे येथील संरक्षक भिंत सलग न बांधता तुटकरित्या बांधल्याने तत्कालीन वनक्षेत्रपाल, भांबुर्डा यांच्यावर दोषारोप पत्र बजावण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर येथील छत्रपती प्रमिलाराजे शासकीय रुग्णालयातील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प बंद असल्याबाबत

**(२१) * १०९७४६ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथील छत्रपती प्रमिलाराजे शासकीय रुग्णालयातील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प बंद असल्यामुळे मैलामिश्रीत व रसायनयुक्त सांडपाणी थेट पंचगंगा नदीत मिसळत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, छत्रपती प्रमिलाराजे शासकीय रुग्णालयातील कचरा उठविण्याचा ठेका असणाऱ्या खाजगी कंपनीचे देयक गेले दहा महिने स्थगिती असल्यामुळे कंपनीकडून कचरा उचलण्यास विलंब होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.
(२) हे अंशत: खरे आहे. छत्रपती प्रमिलाराजे सवोपचार रूग्णालय, कोल्हापूर येथील जैविक कचरा उचलण्याचे काम मे. नेचर इन निड या संस्थेमार्फत करण्यात येते. सदर संस्थेचे माहे डिसेंबर, २०१७ चे देयक प्रलंबित असून सदर देयक कोषागार कार्यालय, कोल्हापूर यांचे कडे सादर करण्यात आले आहे. सदर देयक पारित होताच ते सबंधित कंपनीस अदा करण्यात येईल. तथापि, सदर कंपनीचे माहे मे, २०१७ ते माहे नोव्हेंबर, २०१७ देयक कंपनीस अदा करण्यात आले आहे. तसेच, माहे जानेवारी, २०१८ चे देयक संबंधित कंपनीमार्फत अद्‍याप रूग्णालय प्रशासनास प्राप्त झालेले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयातील प्रधानमंत्री आवास योजनेची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(२२) * १११९५८ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये १३ तालुक्यात मिळुन एकूण ८१६३ घरांचे लक्ष असतांना विविध कारणामुळे या योजनेची कामे संथ गतीने सुरु असल्याने प्रधानमंत्री आवास योजनेची फक्त १ हजार ३३८ कामे पुर्ण झाली असून ६ हजार ८२५ घरांची कामे विविध टप्प्यात प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तिसऱ्या टप्प्यातील घरांची कामे प्रलंबित असल्याने जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून फक्त १९ टक्के लाभार्थींना अनुदान वितरीत करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची चौकशी करुन प्रधानमंत्री आवास योजनेची कामे तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील वीज पुरवठा खंडीत केल्याबाबत

**(२३) * १०७९३३ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील जिल्हा परिषदांच्या तब्बल ४९९ शाळांमध्ये वीजच नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील १ हजार ७०२ शाळांपैकी १ हजार ३०९ शाळांमध्ये कायमस्वरुपी किंवा तात्पुरती वीज आहे परंतु यापैकी अनेक शाळेतील शिक्षकांना स्वखर्चाने मासिक भाडे देऊन शाळेच्या शेजारील घरातून वीज घ्यावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करण्यासह उक्त शाळांना वीज पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

सांगली जिल्हा परिषदेच्या ५८९ शाळांमध्ये थकीत विज देयकामुळे विज पुरवठा खंडीत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) सांगली जिल्हा परिषदेच्या शाळा दुरुस्ती व देखभालीसाठी ४% सादील अनुदानातून प्राधान्याने विज देयक अदा करण्याबाबत तालुका निहाय निधी वाटप करण्यात आले आहे. तथापि, ४% सादील अनुदान देखभाल व दुरुस्तीसाठी अपुरा असल्याने या वर्षाच्या सादील अनुदान प्राप्त करुन घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रावेर (जि.जळगाव) तालुक्यातील विविध गावांमधील विकास कामांना २५१५ अंतर्गत मंजूरी देण्याबाबत

**(२४) * ११३१८१ श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर (जि.जळगाव) तालुक्यातील विविध गावांमध्ये मुलभूत सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी २५१५ या लेखाशिर्षातंर्गत कामाचे प्रस्ताव सादर करण्यात आले असून सदर कामांबाबतचे प्रस्ताव अद्यापी मंजूर झालेले नसल्याने सदरहू विकास कामांबाबत दिनांक २४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधींनी मा.ग्रामविकास मंत्री यांना निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार प्रस्तावांना मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे (लेखाशीर्ष २५१५ १२३८) या योजनेंतर्गत राज्यातील लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांना सदर योजनेंतर्गत उपलब्ध निधी च्या मर्यादेमध्ये मंजूरी देण्याची कार्यवाही शासन स्तरावर अद्याप सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हयातील कुष्ठरोग रुग्णांना औषधे व व्यायामाची साहित्य उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२५) * १०४७८५ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र व राज्य शासनाकडून कृष्ठरोग नियंत्रणासाठी प्रत्येक वर्षी कोट्यवधी रुपये खर्च केला जात असतांनाही सर्वाधिक कृष्ठरुग्ण नागपूर जिल्हयात आढळून आल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यात सर्वाधिक कुष्ठरुग्ण आढळून आलेले असतानाही येथील कुष्ठरुग्णांना मागील दोन वर्षांपासून आवश्यक औषधांसह व्यायामाचे साहित्य उपलब्ध झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा कुष्ठरोग निर्मूलन सोसायटीकडून संबंधित साहित्याची खरेदी झाली नसल्याने सन २०१६-१७ चा निधी परत गेला असून सन २०१७-१८ चा निधीही परत जाण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागपूर वगळता राज्यातील इतर जिल्ह्यांत कुष्ठ रुग्णांना आवश्यक असलेल्या व्यायामाच्या साहित्यांची खरेदी करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील कुष्ठरुग्णांना औषधांसह व्यायामाचे साहित्य उपलब्ध करुन देण्याबाबत व संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत** : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

कुष्ठरुग्णांना बहुविध औषधोपचार केंद्र शासनाकडून मोफत दिला जात असून जानेवारी २०१८ अखेर शोधलेल्या ६५६ रुग्णांवर मोफत औषधोपचार सुरु करण्यात आलेला आहे. कुष्ठप्रतिक्रिया (लेप्रा रिॲक्शन) आलेल्या रुग्णांना आवश्यक औषधे प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय या ठिकाणी मोफत उपलब्ध आहेत. या औषधांचा मागील दोन वर्षापासून कोणताही तुटवडा झालेला नाही.

(३) हे खरे नाही.

तांत्रिक अटींची पूर्तता न झाल्याने सन २०१६-१७ मध्ये रुग्णोपयोगी साहित्याचा केंद्र शासनाचा निधी अखर्चित राहिला होता. सदर अखर्चित निधी परत न जाता सन २०१७-१८ या वर्षासाठी उपलब्ध झालेला आहे व त्यानुसार खर्च करण्यात आलेला आहे. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये प्राप्त झालेला निधी खर्च करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) हे खरे नाही.

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात प्राप्त झालेला अखर्चित निधी राज्यातील इतर जिल्ह्यातील कुष्ठरुग्णांना आवश्यक असणारी पूरक औषधी व साहित्य खरेदीसाठी खर्च करण्यात आली आहे. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये पूरक औषधी व साहित्ये खरेदी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) राज्य स्तरावर नागपूर जिल्ह्यात औषधी न मिळालेबाबत कोणतीही लेखी स्वरुपात तक्रार आलेली नाही तथापि नियमांनुसार राज्यस्तरावरुन राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान या निधीचा विनियोग करणेबाबत स्वयंस्पष्ट सूचना जिल्ह्यांना देण्यात आलेल्या आहेत.

जिल्हास्तरीय खरेदी प्रक्रिया नियमांच्या अधिन असल्याने सहाय्यक संचालक यांना नियमांच्या अधिन राहून मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने सदर प्रक्रिया राबवावी लागते त्यानुसार आवश्यक औषधे व साहित्य खरेदी करणेबाबत राज्यस्तरावर सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

खरेदी प्रक्रियेच्या बाबतीत अधिकाऱ्यांकडून दिरंगाई आढळून न आल्याने सदर अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२६) * १०६०६३ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील कसबा गावात ३२ वर्षापूर्वी म्हणजेच ११ मार्च, १९८६ साली छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक उभारण्याकरिता भुमिपूजन करण्यात आले असून या स्मारकांकरिता ३५ लाख खर्च करण्यात येऊनही अद्यापी स्मारकाचे काम अपूर्णावस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची चौकशी करुन छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकाचे काम तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय. अंशत: खरे आहे.

छत्रपती संभाजी महाराज स्मारकाचा ताबा व मालकी “छत्रपती संभाजी महाराज स्मारक मंडळ रत्नागिरी” या खाजगी संस्थेचा आहे. सदरहू संस्थेने अर्धवट सोडलेले काम कोकण विकास कार्यक्रम अंतर्गत सन २००४-०५ मध्ये रु. १३.५१ लाख व तद्नंतर “क” वर्ग पर्यटन अंतर्गत सन २००८-०९ मध्ये व सन २०११-१२ मध्ये रु. ३५.९८ लाख इतका निधी खर्च करण्यात आला आहे. सदर कामाचा ताबा दि. २६.७.२०१२ च्या पत्रान्वये स्मारक मंडळाकडे दिला असून स्मारकाचा ताबा व मालकी खाजगी संस्थेची असल्यामुळे स्मारकाची देखभाल दुरूस्ती शासनस्तरावरून करण्यास मर्यादा येत असल्यामुळे दि. २.३.२०१७ च्या पत्रान्वये स्मारकाची देखभाल दुरूस्ती स्मारक मंडळाने करणेबाबत कळविण्यात आले आहे. तसेच स्मारक मंडळातील काही सदस्य मयत असल्यामुळे नविन समिती गठीत करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हयातील जिल्हा सामान्य रुग्णालयातील सीटीस्कॅन मशीन व शस्त्रक्रिया गृह बंद असल्याबाबत

**(२७) * १०५९६६ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील जिल्हा सामान्य रुग्णालयातील सीटीस्कॅन मशीन गत एक वर्षापासून नादुरुस्त असून शस्त्रक्रिया गृह मागील ६ महिन्यांपासून बंद असल्यामुळे रुग्णांना तपासणी व उपचारासाठी खाजगी रुग्णालयात जावे लागत

असल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ च्या चौथ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन सीटीस्कॅन मशीन दुरुस्त व शस्त्रक्रिया गृह कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

सार्वजनिक व खाजगी भागेदारी अंतर्गत रेडिओडायग्नोस्टीक सर्व्हीसेस अंतर्गत जिल्हा रुग्णालय, परभणी येथील सी.टी.स्कॅन मशीन दि.१९.०३.२०१५ रोजी उपजिल्हा रुग्णालय, मुखेड, जि.नांदेड येथे स्थलांतरीत करण्यात आले. तथापि, गरजु व अत्यवस्थ रुग्णांसाठी स्थानिक सी.टी. स्कॅन यंत्रधारकासोबत सन २०१४-१५ मध्ये करार करण्यात आलेला आहे. त्यामधून सी.टी. स्कॅन सेवा उपलब्ध करुन दिलेली आहे. जिल्हा रुग्णालय, परभणी येथील ५ शस्त्रक्रिया गृह, अस्थीव्यंग रूग्णालय येथील २ शस्त्रक्रिया गृह आणि नेत्र विभागातील १ शस्त्रक्रिया गृह कार्यान्वित असून, मागिल ६ महिन्यात सदरील ठिकाणी एकही शस्त्रक्रिया गृह बंद नव्हते. सदरील शस्त्रक्रिया गृहात नियमितपणे शस्त्रक्रिया करण्यात येत आहेत.
(२) दि. १५.०९.२०१७ च्या शासन निर्णयान्वये ३१ सी.टी. स्कॅन यंत्रे खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून, जिल्हा रूग्णालय, परभणी करीता नवीन सी.टी. स्कॅन मशीन उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राळेगाव (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) येथील बेंबळा प्रकल्पाच्या कालव्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२८) * ११०७४३ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राळेगाव (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) बेंबळा प्रकल्पाच्या कालव्याची निर्मीती कळंब, राळेगाव, बाभुळगाव व मारेगाव तालुक्यातील क्षेत्र सिचंनासाठी करण्यात आली असून ४० हजार हेक्टर सिंचनाचे उदिष्ट असतांना अर्धे व अपूर्ण

कालव्यांमुळे फक्त १० हजार सिंचन होत असल्याचे दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेंबळा प्रकल्प विभागाने मुख्य कालवे कच्चे मातीचे, उपकालवे वितरीका अपुर्ण व निकृष्ट दर्जाचे बांधकाम केल्यामुळे त्या भागातील शेतकऱ्यांच्या शेतात कालव्याचे पाणी झिरपून शेती पिकांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार बेंबळा प्रकल्पाव्दारे बांधण्यात आलेले अपूर्ण कालवे पूर्ण करण्यासह दोषीं अधिकारी व कंत्राटदार यांचेवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

बेंबळा प्रकल्प बांधकामाधीन व प्रगतावस्थेत असून कालव्यावरील प्रकल्पीय सिंचन क्षमता ४७००० हे. इतकी असून त्यापैकी जून २०१६ अखेर ३३८३० हे. इतकी सिंचन क्षमता निर्मिती झालेली आहे.

सन २०१७-१८ मध्ये या भागात पाऊस कमी झाल्याने धरणामध्ये २८ टक्के इतका जलसाठा झालेला आहे. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी पिण्याचे पाण्यासाठी पाणी आरक्षण केल्यामुळे सिंचनासाठी उपलब्ध पाण्यातून चालू वर्षी सुमारे १०,००० हे. क्षेत्रावर सिंचन झाले आहे.

(२) हे खरे नाही.

बेंबळा प्रकल्पाच्या मुख्य कालव्यास संधानक अस्तरीकरण असून या वरील वितरीका व लघुपाट हे अस्तरीकरण विरहित आहे. मुख्य कालव्याची कामे पूर्ण झालेली असून कि.मी. १ ते ६१ पर्यंतचे भागात २०१० पासून सिंचन सुरू आहे. त्यामुळे सदर कामास देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक असून निधी उपलब्धतेनुसार सदर कामे करण्याचे नियोजन आहे.

कि.मी. ६१ पुढील वितरिका व लघुपाटाची कामे प्रगतीत असल्याने/ अर्धवट असल्याने सिंचनाचे वेळी कालव्याचे पाणी झिरपून शेतीचे थोड्याफार प्रमाणात नुकसान होते. तथापी कालवा व वितरण व्यवस्थेची कामे पूर्ण झाल्यानंतर यावर नियंत्रण मिळविणे शक्य होईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धुळे जिल्ह्यातील जलयुक्त शिवार योजनेच्या कामांबाबत

**(२९) * १०५६१३ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.भारत भालके (पंढरपूर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील ९५ गावांमधील जलयुक्त शिवार योजनेच्या तिसऱ्या टप्प्यासाठी १४८० कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असतांना या कामांपैकी सद्य:स्थितीत केवळ सहा कामे पूर्ण झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मान्यता देण्यात आलेली कामांसाठी निधी उपलब्ध करुन कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) मृद व जलसंधारण विभाग शासन निर्णय दि.२२ मे, २०१७ व दि.०७ जून, २०१७ अन्वये धुळे जिल्ह्यास अनुक्रमे रू.१४.०४ कोटी व ९.०३ कोटी असा एकूण रू.२३.०७ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माणगांव-शिवापूर (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) मार्गावर असलेल्या कर्ली नदीच्या बाजूला संरक्षण भिंत बांधण्याबाबत

**(३०) * १०९४४४ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगांव-शिवापूर (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) मार्गावर असलेल्या कर्ली नदीच्या बाजूने रस्ता खचून वाहतुकीस धोका निर्माण झाला असल्याने रस्ता व नदीच्या बाजूला सरंक्षण भिंत बांधावी अशी मागणी ग्रामस्थांनी व वाहनचालकांनी जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार रस्ता व नदीच्या बाजूला संरक्षण भिंत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही, हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही

प्रश्नांकित रस्ता माणगांव-आंबेरी-वाडोस रस्ता प्रजिमा ५१ व वाडोस-शिवापूर शिरशिंगे रस्ता रा.मा.१९० चा भाग आहे. या रस्त्याच्या काही भागात कर्ली नदी रस्त्याच्या जवळून वाहते. या भागात रस्ता सुस्थितीत आहे. कुठेही संरक्षण भिंत बांधण्याची आवश्यकता नाही.

-----------------

## राज्यात शहरी व ग्रामीण भागात कुपोषणात झालेली वाढ

**(३१) * १०४८९६ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.संजय धोटे (राजूरा), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.कुणाल पाटील**

**(धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भारत भालके (पंढरपूर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), डॉ.आशिष देशमुख (काटोल), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या अहवालानुसार ६ लाख २९ हजार ४२९ बालके कमी वजनाची असल्याची माहिती दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यात विशेषत: जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यात माहे एप्रिल, २०१७ ते डिसेंबर २०१७ मध्ये कुपोषणाचे प्रमाण अधिक झाल्याचे निदर्शनास आले आहे तसेच जळगाव जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या आकडेवारीनुसार माहे जानेवारी ते नोव्हेंबर, २०१७ या ११ महिन्यांत ८९ बालकांचा मृत्यू झाला असून या जिल्हयात १११ बालके तीव्र कुपोषित तर ४२० बालके मध्यम कुपोषित आढळून आले आहे तसेच धुळे जिल्हयात २४८ बालके कुपोषित, रायगड जिल्हयातील १५ तालुक्यात १९६ अतिकुपोषित बालके आढळून आल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरी भागात दर १० हजार मुलांमागे तीव्र कुपोषणाचे प्रमाण ४ ते ५ टक्के आणि मध्यम कुपोषणाचे प्रमाण ८ ते १० टक्के आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, सदर चौकशीअंती शहरी व ग्रामीण भागातील कुपोषणाची समस्या पूर्णपणे संपविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) सदरचे बालमृत्यू हे कुपोषणामुळे झालेले नसून इतर वैद्यकीय कारणांमुळे झालेले आहेत. यात नियत वेळेपूर्वी जन्मलेली बालके (प्रि मॅच्युअर डिलिव्हरी) तापामुळे, व्हॉल्वचा आजार, न्युमोनिया, डायरिया इत्यादि आजारामुळे बालमृत्यू झालेले आहेत.

(३) नाही.

(४) नाही.

(५) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडयातील ०-६ वयोगटातील बालके, गर्भवती, स्तनदा माता, किशोरवयीन मुली यांना - १) पुरक पोषण आहार २) आरोग्य तपासणी ३) संदर्भ सेवा ४) अनौपचारीक पूर्व शालेय शिक्षण ५) लसीकरण ६) आहार व आरोग्य इ. सेवा नियमित देण्यात येत आहेत.

ग्रामीण, नागरी व आदिवासी क्षेत्रातील लहान बालकांच्या कुपोषणावर प्रभावीपणे मात करण्यासाठी ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) योजना सुरु करण्याबाबत प्रशिक्षण व सर्व्हेक्षण सुरु करण्यात आले आहे.

३ ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना ताजा गरम आहारामध्ये सुधारित पध्दतीने पाककृती निश्चितीचे काम सुरु आहे. तीव्र कुपोषित मुलांची नियमित आरोग्य तपासणी, औषधोपचार व विशेष आहार देवून त्यांना साधारण श्रेणीत आणण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धारणी (जि.अमरावती) तालुक्यातील व्याघ्र प्रकल्पाच्या आरक्षित जंगलात आदिवासी उघड्यावर राहत असल्याबाबत

**(३२) * १११८५७ श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारणी (जि.अमरावती) तालुक्यातील व्याघ्र प्रकल्पाच्या आरक्षित जंगलात ७०० ते ८०० आदिवासी उघड्यावर राहत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदिवासींचे अकोट तालुक्यात गेल्या सहा ते सात महिन्यांआधी शासनाने पुनर्वसन केले असून त्या ठिकाणी मुलभूत सुविधा नसल्यामुळे आदिवासींनी त्या जागेवर रहण्यास नकार दिला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जागेवर तातडीने मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) मेळघाट व्याघ्र प्रकल्पातून पुनर्वसित झालेल्या १६ गावांपैकी ८ गावातील नागरिकांना पुनर्वसनाच्या ठिकाणी मुलभूत सुविधा नसल्याने दिनांक ०९.०९.२०१७ रोजी आंदोलन तसेच दिनांक २५.१२.२०१७ ते दिनांक २५.०१.२०१८ या कालावधीत पुनर्वसनाच्या पुर्वीचे गावठाणामध्ये मुक्कामी आंदोलन केले होते.
(२) व (३) उपरोक्त ८ गावातील व्यक्तीनी पुनर्वसनाकरीता पर्याय I निवडला आहे. त्यामध्ये प्रति कुटुंबास रु. १०.०० लक्ष रक्कम घेवून स्वत: पुनर्वसीत होण्याची तरतूद आहे. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १८/०९/२०१७ रोजी मुंबई येथे आयोजित बैठकीमध्ये पुनर्वसीत झालेल्या ८ गावातील गावठाण क्षेत्रात नागरी सुविधा निर्माण करुन देण्याचे निर्देश सर्व संबंधित कार्यकारी यंत्रणा प्रमुख यांना देण्यात आले आहेत. सदर निर्देशाच्या अनुषंगाने पुनर्वसीत झालेल्या गावातील गावठाण क्षेत्रात मुलभूत नागरी सुविधा निर्माण करण्याची कार्यवाही संबंधित यंत्रणेकडून सुरू झालेली असून कार्य प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चोपडा (जि.जळगांव) तालुक्यातील हतनुर प्रकल्पाची कामे अपूर्ण असल्याबाबत

**(३३) * १११८८४ श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चोपडा (जि.जळगांव) तालुक्यातील हतनुर प्रकल्पाच्या कालव्यावरील कामे महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत प्रस्तावित होती परंतु प्रकल्पाची मुदत संपल्यामुळे ही कामे पूर्ण झालेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अपूर्ण कामामुळे चारीच्या शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहोचू शकत नसल्यामुळे शेतकऱ्यांना सिंचनापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पावरील विशेष दुरुस्तीच्या कामांसाठी निधी उपलब्ध करुन देऊन अपूर्ण असलेली कामे पूर्ण करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.जलसंपदा मंत्री व मा.राज्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मागणीनुसार या प्रकल्पावरील विशेष दुरुस्तीच्या कामांसाठी निधी उपलब्ध करुन अपूर्ण असलेली कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) व (४) दिनांक १८.०९.२०१७ रोजीच्या निवेदनाची प्रत प्राप्त नाही. तथापी सन २०१६ - १७ व २०१७-१८ या वर्षात कालवा स्वच्छता मोहिमेअंतर्गत हतनूर कालवा कि. १ ते ९२ आणि त्यावरील पाणी वापर संस्था यांचे दुरूस्तीचे काम पाखरण कार्यक्रमांतर्गत अंतर्भुत करण्यात आलेले आहे व त्यानुसार यांत्रिकी विभागामार्फत सद्यस्थितीत हतनूर कालव्यावर मातीकामाच्या दुरूस्तीचे कामे प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयातील आरोग्ययंत्रणेच्या दुरवस्थेबाबत

**(३४) * १०४७६६ श्री.मनोहर भोईर (उरण), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शासनाच्या प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय व कुटीर रुग्णालय या आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टरच उपलब्ध नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात १३१ वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मंजूर असून यातील ३१ पदे रिक्त असून मोहोपाडा (ता.उरण, जि.रायगड) ग्रामपंचायतीच्या हद्दीत ३५ हजारांच्या आसपास लोकसंख्या असून येथील आरोग्य उपकेंद्रात आरोग्यसेवक, आरोग्यसेविका व डॉक्टरांची कमतरता असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जिल्हा, उपजिल्हा, ग्रामीण, तालुका शासकीय रुग्णालयात व प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य उपचार यंत्रणा व औषधे यांचा तुटवडा असून वैद्यकीय अधिकारी, रोग निदान तज्ञ व इतर सुविधा नसल्याने सिंधुदुर्ग जिल्ह्यात दुर्धर आजाराने ग्रस्त व गंभीर जखमी अपघातग्रस्त यांना तात्काळ औषधोपचार मिळावे यासाठी गोवा राज्यातील बाबूळी येथील गोमेकॉ रुग्णालयात जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रत्नागिरी जिल्ह्यातील शासकीय जिल्हा रुग्णालय रत्नागिरी अंतर्गत उपजिल्हा रुग्णालय कामथे, (ता.चिपळूण) येथील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वर्गाची विशेषतः स्त्रीरोग तज्ञ, भूलतज्ञ व शल्यचिकित्सक आदी पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असून अन्य सेवा-सुविधांचा अभाव असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कोकणातील आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करून तेथील आरोग्य केंद्रांमध्ये अद्यावत सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यासह वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने काणेती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

रायगड जिल्हा परिषद अंतर्गत वैद्यकीय अधिकारी यांची एकुण १२३ मंजूर पदे असून त्यापैकी ९७ पदे भरलेली आहेत व २६ पदे रिक्त आहेत.

उपकेंद्र मोहोपाडा प्रा.आ.कैंद्र लोहोप ता.खालापूर अंतर्गत आरोग्य सेवक (महिला) व आरोग्य सेवक (पुरूष) यांची प्रत्येकी १ पदे मंजूर असून ती भरलेली आहेत. उपकेंद्र स्तरावर डॉक्टरचे पद मंजूर नाही.

(३) अंशत: खरे आहे.

अतितात्काळ उपचारासाठी रूग्णांना सोईनुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय कोल्हापूर किंवा गोवा राज्य सरकारचे बाबूळी येथील वैद्यकीय महाविद्यालयात पाठविण्यात येते.

सद्य:स्थितीमध्ये औषधांचा तुटवडा नाही.

(४) अंशत: खरे आहे.

उपजिल्हा रूग्णालय कामथे ता.चिपळूण जि.रत्नागिरी येथे वैद्यकीय अधिकारी संवर्गाचे एकूण १४ पदे मंजूर असून ७ पदे भरलेली व ७ पदे रिक्त आहेत. स्त्रिरोगतज्ञांचे १ पद मंजूर असून सदर पद रिक्त आहे. भुलतज्ञांची ३ पदे मंजूर असून ३ ही पदे रिक्त आहेत. शल्यचिकित्सकाचे १ पद मंजूर असून रिक्त आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रमाअंर्गत ५ कंत्राटी वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. त्यांचे मार्फत रूग्णांना आवश्यक आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

(५) व (६) वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे ५४००) यांची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावरून सुरू आहे. वैद्यकीय अधिकारी गट-अ (वेतन श्रेणी रू.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ५४००) मधील वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त भरण्याकरिता जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा निवड समिती व्दारे भरतीची प्रक्रीया सुरू आहे. तसेच रिक्त पदावर बंधपत्रीत वैद्यकीय अधिकारी यांना नियुक्ती देण्यात आल्या आहेत.

-----------------

## औरंगाबाद जिल्हास्तरावरील मूत्रपिंड प्रत्यारोपण समिती स्थापन करण्याबाबत

**(३५) * १११००० श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हास्तरावरील मूत्रपिंड प्रत्यारोपण समिती माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये बरखास्त केली असल्याने सुमारे ३० ते ४० रुग्णांना मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रियेकरिता प्रतिक्षा करावी लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन मूत्रपिंड प्रत्यारोपण समिती स्थापन करण्याच्या दिरंगाईमुळे अनेक रुग्णांची गैरसोय होत असल्याने तत्काळ समिती गठीत करून रुग्णांची गैरसोय थांबविण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) (२) व (३) मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा १९९४ (सुधारणा २०११) च्या नियम ११ (४) नुसार व रिट याचिका क्र.१४८५/२०१३ (मास्टर सिद्धांत विक्रम पॉल वि.महाराष्ट्र शासन व इ.) मध्ये मा.उच्च न्यायालयाने सुनावणीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार जिल्हास्तरावरील मुत्रपिंड प्रत्यारोपण समिती बरखास्त केली नसून जी रूग्णालये २५ पेक्षा कमी प्रत्यारोपण करतात अशा रूग्णालयांची रूग्णालयीन प्राधिकरण समिती (Hospital Based Authorization committee) आरोग्य सेवा संचालनालयाच्या दिनांक २०.११.२०१७ च्या आदेशान्वये बरखास्त केली आहे.

तथापि, सर्व रूग्ण वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अंतर्गत असलेल्या वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद येथील राज्य प्राधिकार समितीमध्ये संदर्भित करण्यात येतात.

संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार सद्यस्थितीत वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद येथील राज्य प्राधिकार समितीकडे मुत्रपिंड प्रत्यारोपण करिता प्रतिक्षा सूचीची संख्या निरंक आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घोड नदी (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) कालव्याच्या दुरुस्तीचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(३६) * १०७१९२ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील घोड नदी कालव्याच्या दुरुस्तीचे काम अपूर्ण असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार घोड नदी कालव्याच्या दुरुस्तीचे काम तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे आहे

(२) महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत घोड कालव्याच्या पुर्नस्थापनेचे काम मे. इंगवले पाटील कन्स्ट्रक्शन कंपनीस ब-१ निविदा अन्वये देण्यात आले होते. सदर निविदेचा कालावधी ११/१२/२००७ ते १०/०३/२०११ असुन ठेकेदार यांनी स्वत: होवून दिनांक ०१/०६/२००९ पासुन काम बंद ठेवल्याने व निविदेअंतर्गत नमूद करण्यात आलेल्या माईलस्टोन (Milestone) प्रमाणे काम होत नसल्याने निविदा क्र. ५९.२ (अ) नुसार निविदा विखंडीत करण्यात आली आहे. सदर निविदेच्या विवाद्य बाबींच्या संदर्भातील स्थायी समितीच्या निर्णयाविरुध्द संबंधित ठेकेदाराने जिल्हा न्यायालय, पुणे यांचेकडे दोन दावे दाखल केलेले असून प्रकरण सद्य: न्यायाप्रविष्ठ आहे.

(३) स्थायी समितीच्या दिलेल्या निर्देशानुसार निविदेअंतर्गत करण्यात आलेल्या कामाचे संयुक्त मोजमापे घेण्यात आले असून सिंचन व्यवस्थापनातील अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने यांत्रीकी विभागाच्या मशिनरीद्वारे घोड डाव्या कालव्याचे

गाळ काढणे, भराव दुरुस्ती व कालव्यावरील झाडे झुडुपे काढणेची अत्यावश्यक कामे करण्यात आली असून कालव्यावरील वितरीकेचे व लघु वितरीकांचे गेट तयार करणे व दुरुस्ती करणे इत्यादी कामे यांत्रीकी विभागामार्फत सुरु आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कवठे यमाई (ता.शिरुर, जि.पुणे) येथील घोडनदीवरील फत्तेश्वर बंधाऱ्यावरील रस्त्याची झालेली दुरवस्था

**(३७) * १०९७९१ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कवठे यमाई (ता.शिरुर, जि.पुणे) येथील घोडनदीवरील फत्तेश्वर बंधाऱ्यातून मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती होवून बंधाऱ्यावरील रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने या रस्त्याची दुरुस्ती तातडीने करुन पाण्याची गळती थांबविण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी व नागरिकांनी संबंधितांकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बंधाऱ्यावरील रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले आहे,
(३) असल्यास, त्यानुसार सदर बंधाऱ्यावरील रस्त्याची दुरुस्ती तातडीने करुन पाण्याची गळती थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) होय, सदर बंधाऱ्याची क्षेत्रीयस्तरावर पाहणी करण्यांत आलेली असून को.प.बंधाऱ्याच्या स्लॅबवर लहान मोठे खड्डे पडलेले असल्याचे दिसुन आले. तसेच दगडी बांधकाम, पायातुन व स्तभांच्या बांधकामातुन तसेच काही प्रमाणात जुन्या झालेल्या ढाप्यामधुन पाण्याची गळती आढळुन आली आहे.

(३) सदर बंधाऱ्याचे विशेष दुरुस्ती अंतर्गत अंदाजपत्रक क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे. निधी उपलब्ध होताच दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## देगलूर व बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील मालगुजारी तलावांची दुरुस्ती करण्याबाबत

**(३८) * ११२०२१ श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयातील देगलूर व बिलोली तालुक्यातील प्राचीन व निजामकालीन ४८ मालगुजारी तलाव दुरुस्त करुन सिंचन क्षमता वाढविण्याची मागणी लोकप्रतिनिधीनी दिनांक २ मे, २०१७ रोजी वा सुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त माजी मालगुजारी तलाव दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) व (३) लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद नांदेड अंतर्गत देगलूर व बिलोली तालुक्यातील दुरूस्तीची मागणी केलेल्या माजी मालगुजारी तलावांपैकी ४६ तलावांची दुरूस्ती प्रस्तावित असून तत्संबंधी निधीची मागणी लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ, औरंगाबाद यांनी मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण), पुणे यांचेकडे केलेली आहे.

तसेच बिलोली तालुक्यातील ०४ मालगुजारी तलावांच्या दुरूस्ती कामांस जलयुक्त शिवार अभियान सन २०१७ - १८ अंतर्गत जिल्हाधिकारी, नांदेड यांनी दिनांक २९/१२/२०१७ अन्वये प्रशासकिय मान्यता दिलेली आहे.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील पर्यटनस्थळांच्या विकास आराखड्यास मंजूरी मिळण्याबाबत

**(३९) * १११४२२ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील पर्यटनस्थळांच्या विकासासाठी २४३ कोटी ३८ लाख रुपयांचा आराखडा सन २०१३-१४ मध्ये तयार करुन मंजूरीकरिता शासनाकडे पाठवूनही अद्याप आराखड्यास मंजूरी देण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार उपरोक्त आराखड्यास तात्काळ मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) नाही.

(२) व (३) रायगड जिल्ह्याच्या पर्यटन विकास बृहत आराखड्यास दि.१८/१२/२०१७ च्या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लातूर जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानाच्या तिसऱ्या टप्प्यास मंजुरी मिळूनही कामे सुरु नसल्याबाबत

**(४०) * ११३३२६ श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत येणाऱ्या विविध विकास कामांना गती देण्यासाठी जलयुक्तच्या तिसऱ्या टप्प्यात जिल्ह्यातील १४२ गावांची निवड करण्यात येऊन ३२८ कोटी रुपयांच्या निधीचा आराखडा तयार असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवड झालेल्या तालुक्यांतील गावांचा अहवाल जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालयाला प्राप्त न झाल्यामुळे जलयुक्तच्या तिसऱ्या टप्प्यातील कामांना ३ महिन्यांपूर्वीच मंजुरी मिळूनही कामे अद्याप सुरु झालेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार गावनिहाय गोषवारा सादर करणे व मंजुरी मिळालेल्या कामांना सुरुवात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

लातूर जिल्ह्यातील निवड करण्यात आलेल्या १४२ गावांच्या आराखड्याचे मूल्य रू.१२०.१६ कोटी आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यातील कांद्री ते पांढराबोडी रस्त्याची झालेली दुरवस्था

**(४१) * १०८०७० श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यातील कांद्री ते पांढराबोडी या १५ कि.मी. रस्त्याची दुरवस्था झाली असून सदर रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिनी मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे दिनांक २० नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदर रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अशा प्रकारचे निवेदन ग्रामविकास विभागाकडे प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) जिल्हा परिषदेमार्फत सदर रस्त्याची पाहणी करण्यात आली आहे.

(३) मोहाडी मांडेसर खमारी सितेपार पांढराबोडी काटी धुसाळा कांद्री ते रा.मा. ३३६ या इतर जिल्हा मार्ग क्र. ४१ चा प्रश्नांकित कांद्री ते पांढराबोडी हा भाग रस्ता आहे. या भाग रस्त्याची एकूण लांबी १०.३० कि.मी. आहे. हा भाग रस्ता सा.क्र. १५/८०० ते २६/१०० मध्ये येतो. त्यापैकी सा.क्र. १५/८०० ते १७/८०० कि.मी. लांबीतील डांबराने खड्डे भरण्याचे काम जिल्हा परिषदेमार्फत पूर्ण करण्यात आले आहे. तसेच उर्वरीत सा.क्र.१७/८०० ते २६/१०० कि.मी. हा रस्ता प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत समाविष्ट असून त्यांच्यामार्फत काटी ते धुसाळा पर्यत डांबरी नुतनीकरण व धुसाळा ते कांद्रीपर्यत डांबरी पॅचेसचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हयातील गोदाकाठी वसलेल्या पुनर्वसीत गावासाठी मिळालेल्या निधीचा झालेला गैरव्यवहार

**(४२) * १०७८८८ श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील गोदाकाठी वसलेल्या पुनर्वसीत गावासाठी आलेला १०० टक्के निधी प्रत्यक्षात विकास कामांकरिता खर्च न करता कागदोपत्री खर्च दर्शवून गैरव्यवहार केल्याबाबतची तक्रार माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित अधिकाऱ्यांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार गैरव्यवहार करणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

मा. मंत्री, महसुल व वन विभाग यांचेकडे दि. ०६/०३/२०१७ रोजी तक्रार प्राप्त आहे.

(२) होय.

प्रस्तुत प्रकरणी अप्पर जिल्हाधिकारी व उप जिल्हाधिकारी (पुनर्वसन), अहमदनगर यांनी दिनांक १३ व १५ जुलै, २०१७ रोजी सर्व कामाची पाहणी केलेली आहे. सदर कामे २०११ ते २०१४ या कालावधीत झालेली आहेत.

(३) अप्पर जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्या दिनांक १२/१०/२०१७ च्या पत्रानुसार अधीक्षक अभियंता, दक्षता पथक परिमंडळ, औरंगाबाद यांना चौकशीबाबत कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दिंडनेर्ली दूधगंगा डाव्या कालव्याच्या कामाकरिता संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना मिळणेबाबत

**(४३) * १०५४८० श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करवीर (जि.कोल्हापूर) तालुक्यातील जमीन ओलिताखाली आणणे व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याकरिता शासनाकडून दिंडनेर्ली दुधगंगा डाव्या कालव्याच्या कामाला सन २०१२ साली सुरुवात करून या कामाकरिता ९० शेतकऱ्यांच्या जमिनींचा योग्य मोबदला देण्याचे मान्य केलेले असतानाही अद्याप या शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला दिला नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकरी बांधवाना योग्य मोबदला देण्याचे सर्वे करणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांनी मान्य केलेले असतानाही अद्याप मोबदला न मिळाल्याने सदर कृती समितीने अनेक वेळा आंदोलने केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची चौकशी करुन त्यानुसार दिंडनेर्ली दुधगंगा डाव्या कालव्याच्या कामासाठी संपादित केलेल्या जमिनींच्या शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

प्रश्नाधीन संपादित जमिनीचा योग्य मोबदला देण्यात आला आहे.

(२) आंदोलने केली आहेत. परंतु शेतकरी बांधवांना योग्य मोबदला अदा करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चाकण (ता.खेड, जि.पुणे) ग्रामपंचायतीत अनधिकृत नोंदी करुन केलेला गैरव्यवहार

**(४४) * ११२६९८ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण (ता.खेड, जि.पुणे) ग्रामपंचायतीने माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाची कोणतीही परवानगी न घेता संगनमताने मासिक सभेमध्ये ठराव करून २६५४ अनधिकृत नोंदी रजिस्टरमध्ये एकाच रात्रीत केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नोंदी करताना ग्रामपंचायत चाकण यांनी ज्या करारनाम्याच्या नोंदी केलेल्या आहेत त्या करारनाम्याबाबत शासनाचा महसूल बुडाला किंवा कसे याबाबतची चौकशी करण्याबाबत सह जिल्हा निबंधक वर्ग १ (निम्न श्रेणी) पुणे यांना कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशीच्या अनुषंगाने शासनाचा बुडालेला महसूल वसूल करण्यासह महसूल बुडविणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शसानाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

परंतु उक्त नोंदी करताना ग्रामपंचायत चाकण यांनी ज्या करारनाम्यांवरुन नोंदी केलेल्या आहेत त्या करारनाम्यांबाबत शासनाचा महसूल

बुडाला आहे किंवा कसे ? याची चौकशी करण्यासाठी सह जिल्हा निबंधक कार्यालय, पुणे यांचेशी समक्ष चर्चा केली असता त्यांनी नोंदी केलेल्या मिळकतींबाबत अधिक सविस्तर माहिती देणे आवश्यक असल्याचे सांगितले व त्यास अनुसरुन जिल्हा परिषद यांनी पत्र क्र. जिप/पंचा/७/३५४/१७ दि. ७/७/२०१७ अन्वये गट विकास अधिकारी पं.स.खेड यांना अपेक्षित माहितीचे प्रपत्र करुन त्यानुसार माहितीची मागणी करण्यात आलेली आहे.

(३) व (४) याबाबत गट विकास अधिकारी पं.स.खेड यांनी, ग्रामपंचायत चाकणचे रुपांतर एप्रिल २०१५ मध्ये चाकण नगरपरिषदेमध्ये झालेले आहे. त्यामुळे आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करुन घेणे व मिळकत निहाय पडताळणी करण्यास विलंब होत आहे. परंतु पाठपुरावा करण्यात येऊन माहिती सादर करण्याची दक्षता घेण्यात येत आहे, असे कळविलेले आहे.

गट विकास अधिकारी, पंचायत समिती खेड यांचेकडील अहवाल प्राप्त झाल्यानंतर परिपुर्ण प्रस्ताव सह जिल्हा निबंधक वर्ग-१ पुणे (ग्रामीण) यांना सादर करण्याची दक्षता घेण्यात येत आहे असे जिल्हा परिषद, पुणे यांनी कळविले आहे.

-----------------

## मौजे नायरी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील नायरी बौध्दवाडी-मराठवाडी या रस्त्याची झालेली दुरवस्था

**(४५) * १०७४५२ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नायरी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील नायरी बौध्दवाडी-मराठवाडी (ग्रामीण मार्ग क्र. १३८) या रस्त्याची दुरवस्था झाली असून या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्यासाठी आवश्यक निधी शासनाने तातडीने उपलब्ध करुन द्यावा याकरिता नायरी (मराठवाडी) ग्रामविकास मंडळ, मुंबई यांच्यातर्फे मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे दिनांक ०६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गाव डोंगराळ भागात असून पावसाळ्यात प्रचंड पाऊस पडत असल्याने ग्रामस्थ व विद्यार्थ्यांना या रस्त्यावरुन ये-जा करणे जिकिरीचे ठरत असून या ठिकाणचे रस्ते अजूनही दगड मातीचे असल्याने तातडीचे वैद्यकीय उपचार करणे देखील अशक्य होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रस्त्याचे काम सन २००५ मध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत मंजूर झाले होते मात्र जुनी रोजगार हमी योजना बंद करण्यात आल्याने जुन्या योजनेतील कामांचा आढावा घेऊन सदर कामे इतर योजनेतून पूर्ण करावी असे सूचित करुन, जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी दिनांक २० जुलै, २०११ रोजी हे काम वगळून सदर काम जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत करण्यासाठी वर्ग केले तथापि, सदर कामास अद्यापपर्यंत जिल्हा वार्षिक योजनेतून मान्यता प्राप्त झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सुमारे तीन कि.मी. च्या या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी रु. ३९ लक्ष इतक्या निधीची आवश्यकता असून जिल्हा परिषदेमार्फत वा जिल्हा वार्षिक योजनेतून कामास मान्यता प्राप्त करुन घेण्याबाबत व त्यानुषंगाने तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) अशा प्रकारचे निवेदन ग्राम विकास विभागाकडे प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. तथापि, सदर रस्ता नादुरुस्त झालेला आहे, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) प्रश्नांकित प्र.जि.मा. ४७ ते नायरी बौध्दवाडी-मराठवाडी या ग्रामीण मार्ग क्र. १३८ रस्त्याची दुरावस्था झाली असल्याने जिल्हा परिषदेस रस्ते व पूल दुरुस्ती अंतर्गत विविध योजनांमधून प्राप्त होणाऱ्या निधीमधून अथवा जिल्हा वार्षिक योजनेमधून सदर रस्त्याचे काम प्राथम्याने प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेला सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खडकपुर्णा (ता.देऊळगावराजा, जि.बुलढाणा) उपसासिंचन अंतर्गत डाव्या कालव्याच्या शेतचारीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(४६) * १०८६१८ श्री.राहुल बोंद्रे (चिखली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित**

**झनक (रिसोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देऊळगावराजा (जि.बुलढाणा) येथील खडकपुर्णा उपसासिंचन टप्पा क्रमांक एक अंतर्गत डाव्या कालव्याच्या उजव्या बाजूमधील शेतचारीचे काम व्यवस्थीत केले नसल्याने कालव्याचे पाणी शेतात शिरुन पीकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असल्याने संबंधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी मागणी करण्यात येवूनही अदयापी शेतकऱ्यांना पीकाची नुकसान भरपाई देण्यात आलेली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार शेतकऱ्यांच्या पीकांची नुकसान भरपाई देण्यासह कालव्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) शेतकऱ्यांकडून शेतीची मशागत करतांना कालव्याच्या कडेच्या बाजूची कॅच वॉटर ड्रेन बुजल्यामुळे कालव्याचे पाणी शेतात झिरपले आहे व त्याबाबत नुकसान भरपाई अद्याप देण्यात आलेली नाही हे खरे आहे तथापी शेतचारीचे काम व्यवस्थीत केले नाही ही बाब खरी नाही.
(२) तालुका कृषी अधिकारी, तलाठी व संबंधित जलसंपदा विभागाचे क्षेत्रिय अधिकारी यांनी प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन पिकाची पाहणी करुन पंचनामा केला आहे.
(३) पंचनामा अहवाल कृषि विभागास सादर करण्यात आला असून पीक मूल्यांकनाची कार्यवाही सुरु आहे. मशागतीच्या वेळी कॅचवॉटर ड्रेन बुजल्यामुळे सदर बाब उद्‌भवली असून कालव्याचे काम निकृष्ट झालेले नाही. त्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## राज्यात शहरी भागातील झोपडपट्ट्यांमध्ये बालमृत्यूचे वाढलेले प्रमाण

**(४७) * १०५००८ श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई आणि नागपूर या राजधानी व उपराजधानीसह राज्यातील शहरी भागातील झोपडपट्ट्यांमध्ये कुपोषणामुळे बालमृत्युचे प्रमाण व रुग्णालयात प्रसूती होऊन देखील नवजात मृत्युचे प्रमाण अधिक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यात ५ वर्षाखालील मुलांच्या बुटकेपणाचे प्रमाण ३४.४ टक्के ने वाढले असून, लुकडेपणाचे प्रमाण हे २५.६ टक्क्यांनी वाढलेले आहे तसेच अतितीव्र लुकडेपणातही ९.४ टक्क्यांनी वाढ झाल्याचे नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हेने सन २०१५-१६ च्या अहवालात नमूद केल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील शहरी भागात अंगणवाड्यांची संख्या व आरोग्यसेविकांची संख्या कमी असल्याने गर्भवती महिलांना आवश्यक माहितीदेखील त्यांच्यापर्यंत पोहचत नसल्याने रुग्णालयात प्रसूती होवूनही बालमृत्यूचे प्रमाणही शहरी भागात जास्त आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कुपोषणामुळे होणारे वाढते बालमृत्युचे प्रमाण कमी करण्याच्या अनुषंगाने शहरी तसेच ग्रामीण भागात राज्य शासनाने कोणती निर्णयात्मक उपाययोजना केली व या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

माहे डिसेंबर, २०१७ च्या एमपीआर नूसार शहरी भागातील अंगणवाड्यांची मंजूर संख्या १५५३२ इतकी असून कार्यरत अंगणवाड्या १५५१९ आहेत. सदर कार्यरत अंगणवाड्यांमध्ये १५२३८ अंगणवाडी सेविका कार्यरत आहेत. राज्यात १ ते ५ वयोगटातील एकूण २७३ बालमृत्यू झाले असून त्यापैकी २० बालमृत्यू हे शहरी भागात झाले आहेत.

(४) सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राज्यातील बालमृत्यू व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी पुढील उपाययोजना करण्यात येतात :-

गरोदरपणातील संपूर्ण तपासणी व उपचार, संस्थात्मक प्रसुती, जननी शिशू सुरक्षा कार्यक्रम, जननी सुरक्षा योजना, नियमित लसीकरण, नवजात काळजी कक्ष, नवजात स्थिरीकरण कक्ष, विशेष नवजात काळजी कक्ष, एचबीएनसी व ईन्टेन्सिफाईड एचबीएनसी, जीवनसत्व, "अ" व जंतनाशक मोहीम, बालउपचार केंद्र, पोषण पुनर्वसन केंद्र, राष्ट्रीय बालस्वास्थ कार्यक्रम, मानव विकास कार्यक्रम अंतर्गत तज्ञांमार्फत मातांची व बालकांची तपासणी व

उपचार. नवसंजीवनी कार्यक्रमांतर्गत मातृत्व अनुदान योजना, भरारी पथकामार्फत गरोदर माता, स्तनदा माता, नवजात अर्भके व बालकांची आरोग्य तपासणी व उपचार, दायी बैठक योजना इत्यादि.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात स्वाईन फ्ल्यूचे निदान करणारी केंद्र उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४८) * १०५३८५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मोठ्या प्रमाणात स्वाईन फ्ल्यूची लागण होऊन बळीची संख्या झपाटयाने वाढत असतानाही या साथीचे निदानाकरिता पुरेशी चाचणी केंद्र उपलब्ध नसून संपूर्ण राज्यात स्वाईन फ्ल्यूचे निदान करणारी फक्त ७ केंद्रे अस्तित्वात असल्याची बाब दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वाईन फ्ल्यूचा वाढता प्रसार रोखण्यासाठी जिल्हा निहाय स्वाईन फ्ल्यूची चाचणी केंद्र उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

राज्यात सध्या स्वाईन फ्ल्यू निदानासाठी २४ प्रयोगशाळा कार्यरत आहेत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक शहरातून जाणाऱ्या गोदावरी उजव्या कालव्यावर अनधिकृत बांधकामे केल्याबाबत

**(४९) * १०६९३९ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगापुर धरण ते एकलहरे पर्यंत नाशिक शहरातून जाणाऱ्या गोदावरी उजव्या कालव्यावर मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे करुन नाशिक जलसंपदा विभागाची हजारो एकर जमिन बळकाविण्यात आल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यांचे जमाबंदी आयुक्त यांनी जिल्हाधिकारी व मनपा आयुक्त व जलसंपदा विभागाची संयुक्त बैठक घेऊन जलसंपदा विभागाची सदरहू जमीन ताब्यात घेण्याबाबतच्या सूचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गोदावरी उजव्या कालव्यावरील अनधिकृत बांधकामांची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार अनधिकृत बांधकामे निष्कासीत करण्यासह संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

नाशिक उजवा तट कालवा सा.क्र.०/०० ते २३/०० पर्यंतची लांबी दि.२०/२/१९९८ पासून नाशिक महानगरपालिकेस ९९ वर्षाकरीता भाडेपट्टयाने देण्यात आली आहे. त्याच्या काही भागात अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आलेले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

दि.११/१२/२०१७ रोजी जमाबंदी आयुक्त यांनी महानगर पालिका आयुक्त, जिल्हाधिकारी व जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत संयुक्त बैठक घेतली होती. सदर बैठकीत नाशिक शहरातील नाशिक उजवा तट कालवा व नाशिक डावा तट कालव्यासाठी संपादीत करण्यात आलेल्या जमिनींची नोंद प्रॉपर्टी कार्डवर घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

(३) उपरोक्त क्षेत्र हे महानगरपालिकेच्या ताब्यात असल्याने त्यांच्याशी करण्यात आलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार सदर जमिनींवर असलेले अतिक्रमण काढण्याची कार्यवाही ही महानगरपालिका, नाशिक यांचेमार्फत होणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औंध (जि.पुणे) येथील वॉटरफ्रंट कन्स्ट्रक्शन्स कंपनीने बनावट कागदपत्रे सादर करुन केलेला गैरव्यवहार

**(५०) * १०५०७२ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंध (जि.पुणे) येथील वॉटरफ्रंट कन्स्ट्रक्शन्स प्रा.लि. या कंपनीने सन २००८ ते २०१४ या कालावधीत बनावट कागदपत्रे सादर करून विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने २९ लघुपाटबंधारेची कामे मिळविल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी मा. न्यायदंडाधिकारी, कणकवली तसेच लोकायुक्त, मुंबई यांनी सदर कंपनीला काळ्या यादीत टाकून कंपनी संचालकांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश देवूनही कंपनीवर अद्याप कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कंपनीला कोट्यवधी रुपयांची कामे अवैधरित्या मिळून देण्यामध्ये कनिष्ठ अभियंत्यापासून मुख्य अभियंत्यापर्यंतच्या अधिकाऱ्यांचाही समावेश असल्याने संबंधितांवर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार वॉटरफ्रंट कन्स्ट्रक्शन्स कंपनी व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.
(४) वॉटरफ्रंट कन्स्ट्रक्शन्स प्रा.लि.पुणे यांच्या कामाविषयी झालेल्या तक्रारीबाबत मा. न्यायदंडाधिकारी, कणकवली यांचे आदेशानुसार वैभववाडी पोलीस ठाणे, जि. सिंधुदूर्ग येथे सी.आर.पी.सी.१५६ (३) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. मा. लोकआयुक्त यांचे निरीक्षण व आदेशानुसार सदर कंपनीविरुध्द कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या स्तरावर विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील मोर्ले गावातून पारगड किल्लामार्गे कोल्हापूरला जोडणाऱ्या रस्त्याच्या कामाबाबत

**(५१) * ११२४६४ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील मोर्ले गावातून पारगड किल्लामार्गे कोल्हापूरला जोडणाऱ्या मार्गास मंजूरी मिळाली असून सदरहू रस्त्याचे काम अत्यंत धिम्यागतीने सुरू आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू ९.५० कि.मी. अंतराच्या रस्त्यापैकी सुमारे ६ कि.मी. रस्ता वनविभागाच्या अखत्यारित येत असून त्यामुळे काम सुरू केले जात नसल्याने मोर्ले, पारगड ग्रामस्थांनी दोडामार्ग वनक्षेत्रपालांना घेराव घालून आंदोलन केले असता, सुमारे ६ कि.मी. वनखात्याच्या हद्दीतील रस्त्याचे काम दिनांक २१ जानेवारी, २०१८ अखेरपर्यंत पूर्ण करून देण्याचे आश्वासन वन विभागाच्यावतीने देण्यात आलेले असतानाही आजमितीस त्याची पूर्तता झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वनविभागाकडून ग्रामस्थांना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता न झाल्याने दिनांक २२ जानेवारी, २०१८ रोजी मोर्ले, पारगड ग्रामस्थांनी पुन्हा दोडामार्ग वनक्षेत्रपालांना घेराव घालून काम त्वरीत करण्यासाठी दोडामार्ग वनविभागाच्या कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा लेखी निवेदनाद्वारे दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मोर्ले-पारगड या एकूण ९.५० कि.मी. रस्त्यापैकी सुमारे ६ कि.मी. अंतराच्या वन खात्याच्या अखत्यारीतील रस्त्याचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) केंद्रीय पर्यावरण, वने व जलवायु परिवर्तन मंत्रालयाने सदर रस्त्याकरीता सिंधुदुर्ग व कोल्हापूर जिल्हयातील एकूण २०.४२९ हेक्टर वनक्षेत्र वळतीकरणास काही अटींच्या अधीन राहून दिनांक १२/०१/२०१५ रोजी तत्वत: मान्यता प्रदान केली आहे. केंद्र शासनाच्या तत्वत: मान्यता आदेशातील आवश्यक अटींची जसे की, नक्त वर्तमान मूल्य (NPV), पर्यायी वनीकरणासाठीची रक्कम व वनेत्तर क्षेत्र वन विभागास हस्तांतर इ.बाबत पूर्तता अहवाल प्रकल्प यंत्रणेने सादर केल्यानंतर मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर यांनी दिनांक २६/०२/२०१८ रोजीच्या आदेशान्वये वनक्षेत्रावर काम सुरु करण्यास परवानगी दिली आहे.
(२) व (३) मौजे-मोर्ले, पारगड (जि.सिंधुदुर्ग) येथील ग्रामस्थांनी वनक्षेत्रपाल, दोडामार्ग यांना घेराव घालून प्रस्तुत रस्त्याचे काम त्वरित सुरु करण्याची मागणी केली आहे. तथापि, बेमुदत उपोषणासाठी लेखी निवेदन प्राप्त झालेले नाही.
(४) व (५) केंद्र शासनाच्या दिनांक १२/०१/२०१५ रोजीच्या तत्वत: मान्यता आदेशातील आवश्यक अटींचा पूर्तता अहवाल प्राप्त होताच मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर यांनी दिनांक २६/०२/२०१८ रोजीच्या आदेशान्वये वनक्षेत्रावर काम सुरु करण्यास परवानगी दिली आहे.

-----------------

## सांगली जिल्हयातील सहयाद्री व्याघ्र प्रकल्पातील १४ गावांच्या पुनर्वसनाबाबत

**(५२) * ११२३१३ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील सहयाद्री व्याघ्र प्रकल्पातील १४ गावांचे पुनर्वसन २० वर्षे होऊन गेली तरी अद्याप पूर्ण झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहयाद्री व्याघ्र प्रकल्पातील १४ गावांचे पुनर्वसन अद्यापी न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सांगली जिल्हयात व्याघ्र प्रकल्पातील पुनर्वसनासाठी आतापर्यंत किती जमीन संपादित करण्यात आली व अद्याप किती जमीन संपादित होणे बाकी आहे,

(४) असल्यास, या प्रकल्पग्रस्तांनी शासनाकडे क्षेत्र जमीन मिळत नसल्याने जमिनीऐवजी रोख रक्कमेची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) सहयाद्री व्याघ्र राखीव क्षेत्रातील चांदोली राष्ट्रीय उद्यानात असलेल्या १४ गावांपैकी १२ गावांचे पुनर्वसन सांगली जिल्हयात करण्यात आले असून त्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही सुरु आहे.

(२) व (३) सहयाद्री व्याघ्र राखीव क्षेत्रांतर्गत चांदोली राष्ट्रीय उद्यानातील १२ गावांचे पुनर्वसन सांगली जिल्हयात करण्यात आले आहे. १४ गावांतील एकुण ९३५ खातेदारांना एकुण ११५३.८९ हेक्टर जमीन देय आहे. ११५३.८९ हेक्टर क्षेत्रापैकी ५३६.७४ हेक्टर इतके क्षेत्र प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यात आले असून ६१७.१५ हेक्टर क्षेत्र वाटप होणे बाकी आहे.

जमीन वाटपासाठी आवश्यक क्षेत्र उपलब्ध झाल्यावर पुनर्वसनाची पूढील प्रक्रिया सुरू करण्यात येईल.

(४) स्थानिक लोकप्रतिनिधींनी जमीन उपलब्ध होत नसेल तर, जमिनीच्या किंमतीच्या चार पट रक्कम खातेदारांना वाटप करण्याची मागणी केली आहे.

(५) जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचे ताब्यात असलेले क्षेत्र, मुलकी पड, गायरान व वनजमीन उपलब्धतेनुसार प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनीचे वाटप करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील अप्पर वर्धा प्रकल्पांतर्गत कालव्यातून पाण्याचा अपव्यय होत असल्याबाबत

**(५३) * १०६६६५ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अप्पर वर्धा प्रकल्पांतर्गत तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील डावा मुख्य कालवा मोठ्या प्रमाणात क्षतीग्रस्त झाला असल्याने दररोज लाखो लीटर पाण्याचा अपव्यय होत असून पाण्यामुळे लगतच्या भागाला तलावाचे स्वरुप आल्याचे दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अप्पर वर्धा धरणाच्या कालव्याद्वारे रब्बी हंगामाच्या सिंचनासाठी पाणी सोडण्यात येत असुन लघु कालवा आणि पाटचऱ्यांची स्वच्छता, खोदकाम व डागडुजी करण्यात आलेली नसल्याने कालव्याला जागोजागी छोट्या मोठ्या भेगा पडलेल्या असल्याने तसेच संबंधीत विभागाच्या दुर्लक्षतेमुळे दररोज लाखो लीटर पाण्याचा अपव्यय होऊन शेतकऱ्यांना मुबलक प्रमाणात शेतीसाठी पाणी मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कालव्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार सदर कालव्याच्या दुरुस्तीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही, अशा प्रकारची घटना घडलेली नाही. अप्पर वर्धा प्रकल्प अंतर्गत अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्यामध्ये डावा मुख्य कालवा नसून उजवा मुख्य कालवा आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील जे.जे. रुग्णालयाचे सुपरस्पेशालिटी रुग्णालय बांधण्यासाठी आवश्यक परवानगी महानगरपालिकेकडून देण्यास विलंब होत असल्याबाबत

**(५४) * १०६९९३ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जे.जे. रुग्णालयाचे सुपरस्पेशालिटी रुग्णालय बांधण्यासाठी ८८१ कोटी रुपयांचा आराखडा तयार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रुग्णालयाचा आराखडा तयार असूनही आवश्यक ती परवानगी देण्यास महानगरपालिका प्रशासन विलंब करीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सुपरस्पेशालिटी रुग्णालयामुळे हजारो गोरगरीब रुग्णांना वैद्यकीय सेवा मिळणार असल्याने या कामात अडवणूक करणाऱ्या महानगरपालिका अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच जे.जे. रुग्णालयाचे सुपरस्पेशालिटी आराखड्याला मान्यता देऊन सदरहू काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) शासनास प्राप्त अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## म्हसळा (जि.रायगड) तालुक्यात मोठ्या प्रमाणात वणवे लागत असल्याबाबत

**(५५) * ११०५९२ श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हसळा (जि.रायगड) तालुक्यात गेली अनेक वर्षे मोठ्या प्रमाणात वणवे लागत असल्याने आतापर्यंत ३८ टक्के गावात वणव्याची झळ पोहोचली असल्याने गुरांच्या चाऱ्याची समस्या निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, म्हसळा (जि.रायगड) तालुक्यातील नेवरूळ, घुम, रूद्रवट, कोकबन, केलेट, पानवे, गाणी आदी भागात वणवे लागल्याने या भागातील शेकडो शेतकऱ्यांचे व बागायतदारांचे माहे डिसेंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जंगलाची जाळरेष काढण्यासाठी शासनाचा निधी कमी मिळत असल्यामुळे सर्वच ठिकाणी जाळरेषा काढता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) ठाणे वनवृत्तातील रोहा वनविभागातील म्हसळा तालुक्यात सन २०१४ ते माहे जानेवारी, २०१८ अखेर या चार वर्षांच्या कालावधीत वनक्षेत्रामध्ये वणव्याच्या एकूण १६ घटना घडल्या असून त्यामध्ये एकूण १९२.०० हे. क्षेत्र जळीत झाले आहे.

(२) म्हसळा तालुक्यातील (जि.रायगड) नेवरूळ, घुम, रूद्रवट, कोकबन, केलेट, पानवे, गाणी या गावांच्या वनक्षेत्रामध्ये सन २०१७-१८ (माहे जानेवारी अखेर) मध्ये वणवे लागल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) रोहा वनविभागाच्या अधिनस्त असलेल्या वनक्षेत्राभोवती दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून जाळरेषा घेण्याचे काम पुर्णत्वाने करण्यात येते.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंदी रेल्वे ते विखणी - जसापूर (ता.सेलू, जि.वर्धा) या रस्त्याची झालेली दुरवस्था

**(५६) * ११०८१८ श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदी रेल्वे (ता.सेलू, जि.वर्धा) येथील सिंदी रेल्वे ते विखणी - जसापूर या ५ कि.मी. रस्त्यावरील गिट्टी उखडली असून रस्त्यावर ठिकठिकाणी खोल खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे रस्त्यावरून प्रवास करताना विद्यार्थी, ग्रामस्थ व प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार या रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) अंशत खरे आहे.
(३) सदर रस्त्याची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली आहे.
(४) सिंदी रेल्वे ता.सेलू, जि.वर्धा येथील सिंदी रेल्वे ते दिग्रस गावापर्यंतचा ग्रामीण मार्ग क्र. २१ हा रस्ता सुस्थितीत आहे. त्यापुढील समुद्रपूर तालुक्यातील तालुक्याच्या सिमेपासून ते दिग्रस-विखणी-जसापूर हा तालुका सिमेपर्यंतचा ग्रामीण मार्ग क्र. १०२ असून त्याची ४.०० कि.मी.लांबी आहे. त्यापैकी ०/०० ते १/२०० कि.मी. लांबीतील नुतनीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. त्यापुढील १/२०० ते २/०० कि.मी. रस्ता सुस्थितीत आहे. २/०० ते ४/०० कि.मी. रस्ता खराब असून हा रस्ता सन २०१७-१८ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेतून मंजूर असून पुढील कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सेंट जॉर्ज रुग्णालय (मुंबई) येथे सिटीस्कॅन मशिन गत एक वर्षापासून विनावापर पडून असल्याबाबत

**(५७) * १०७७७० श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर**

**ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेंट जॉर्ज रुग्णालयात (मुंबई) सिटीस्कॅन मशिन उपलब्ध होण्याकरीता रुग्णालय प्रशासनाने अनेक वर्षापासून शासनाशी वारंवार पत्रव्यवहार करुन गेल्यावर्षी ७ कोटी रुपये इतका निधी खर्च करुन अत्याधुनिक सोई-सुविधांनी परिपूर्ण असलेले जर्मनीहून मागविलेले सिटीस्कॅन मशिन गत एक वर्षापासून विनावापर पडून असल्याची बाब दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेंट जॉर्ज रूग्णालयात सिटीस्कॅनची सेवा उपलब्ध नसल्यामुळे दररोज रूग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या ५०० हून अधिक रूग्णांना सिटीस्कॅन करण्यासाठी सर जे.जे.रूग्णालय वा गोकुळदास तेजपाल (जी.टी.) रूग्णालयात पाठविण्यात येत आहे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिटीस्कॅन मशिन येण्यापूर्वी आवश्यक पूर्व तयारी न करणे तसेच मशिन आल्यानंतर तातडीने त्याचा उपयोग सुरु न करणे व मशिन एक ते सव्वा वर्ष विनावापर पडून राहणे यांस रुग्णालय प्रशासनातील अधिकारी जबाबदार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह रूग्णालयातील सिटीस्कॅनची सेवा रुग्णांना तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ईसासनी (वागदरा) (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथे बनावट कर पावती पुस्तक छापून केलेला गैरव्यवहार

**(५८) * १०५७६८ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायत ईसासनी (वागदरा) (ता.हिंगणा, जि.नागपूर) परिसरातील बहूजन नगर, भीमनगर, गजानन नगर येथील अतिक्रमित झोपड्यांना या परिसरातील काही लोकांनी ग्रामपंचायत ईसासनीच्या कर वसूलीच्या पावती पुस्तिका व्यतिरिक्त बनावट पावती पुस्तक छापून बनावट पावती पुस्तिकांच्या आधारे मोठ्या प्रमाणावर करवसूली केली असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान ग्रामविकास कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार बनावट पावती पुस्तक छापून करवसूली करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

ग्रामपंचायत ईसासनी येथील ग्रामविकास अधिकारी यांना सहा बनावट पावत्या दिनांक १६.१२.२०१७ रोजी प्राप्त झाल्या. उपरोक्त प्राप्त पावत्यांच्या संबंधात ग्रामपंचायत रेकॉर्डची चौकशी केली असता कर वसुली पावत्या बनावट असल्याचे दिसून आले.

बनावट पावत्यावर दिनांक नमुद नसून त्यावर त्रिमुर्तीचे गोल सिल लावण्यात आले. असे सिल ग्रामपंचायतीकडे असल्याचे दिसून आले नाही. तसेच बनावट पावत्यावर नमुद करण्यात आलेली भोगवटारांची नावे ग्रामपंचायत रेकॉर्ड नमुना नं.९ व नमुना नं.८ वर दिसून आलेली नाहीत.

ग्रामपंचातीकडे उपलब्ध त्याच क्रमांकांच्या पावत्यांची चौकशी केली असता बनावट पावत्या व ग्रामपंचायतीकडे उपलब्ध असलेल्या त्याच क्रमांकाच्या पावत्यात तफावत दिसून आली.

ग्रामविकास अधिकारी, ग्रामंपचायत ईसासनी यांनी ठाणेदार पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी नागपूर शहर यांचेकडे दिनांक १७.११.२०१७ व दिनांक १६.१२.२०१७ रोजी लेखी तक्रार दाखल केली आहे.

ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत ईसासनी यांनी दिनांक १६.१२.२०१७ रोजी जाहीर दवंडी देवून अवैद्य पावत्या आढळल्यास ग्रामपंचायतीला संपर्क साधावे असे ग्रामस्थांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुटुंब कल्याण व आरोग्यविषयक विविध कार्यक्रम राबविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या अनुदानाबाबत

**(५९) * १०५८९६ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुटुंब कल्याण व आरोग्यविषयक विविध कार्यक्रम राबविणाऱ्या शासनाच्या कुटुंब कल्याण केंद्राप्रमाणेच स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविणाऱ्या केंद्राना यापुढे अनुदान मिळू शकणार नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र सरकारकडून यापुढे अनुदान मिळू शकणार नसल्याने स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविली जाणारी सर्व कुटुंब कल्याण केंद्रे आर्थिक अडचणीत आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने स्वत:च्या निधीतून कर्मचाऱ्यांना वेतन व अनुदान द्यावे अशी मागणी केंद्रप्रमुखांनी केली असून अन्यथा उपोषण करुन आंदोलन करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार स्वयंसेवी संस्थांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) सदर योजना केंद्र शासनाचे निकष व नियमाप्रमाणे राबविली जाते. केंद्र शासनाच्या दि.२५.५.२०१२ च्या कार्यालयीन आदेशानुसार या कार्यक्रमासाठी फक्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी सहाय्यक अनुदान अनुज्ञेय आहे व त्यांचे मार्फत कुटुंब कल्याण कार्यक्रम यशस्वीरित्या राबविण्यात येत आहे. स्वयंसेवी संस्थांच्या केंद्रांना अनुदान अनुज्ञेय नाही.

(३) कर्मचारी संघटनेकडून निवेदन प्राप्त आहे.

(४) सदर योजना १०० % केंद्र पुरस्कृत असल्याने केंद्र शासनाच्या नियमानुसार कार्यवाही केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजा-झारेवाडा (ता.एटापल्ली, जि.गडचिरोली) येथील जलयुक्त शिवार योजनेच्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(६०) * ११२००८ श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा-झारेवाडा, (ता.एटापल्ली, जि.गडचिरोली) येथे सन २०१६-१७ मध्ये जलयुक्त शिवार योजनेंतर्गत मंजूर कामांमधील अर्धवट कामे करून कंत्राटदारांना मंजूर कामांचे पूर्ण देयके देण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या झालेल्या कामांमध्ये गैरव्यवहार झाला असल्याने याबाबतची चौकशी करण्याची मागणी स्थानिक शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचेकडे निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) व (४) होय.

उपविभागीय कृषि अधिकारी, अहेरी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेली समिती तसेच जलयुक्त शिवार अभियान दक्षता पथक, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांनी मौजा-झारेवाडा येथील कामांची चौकशी केलेली असुन चौकशीवेळी स्थानिक शेतकऱ्यांनी सदर तक्रार गैरसमजुतीतून केल्याचा जबाब दिला आहे. तसेच सदर कामांबद्दल तक्रार नसल्याचे स्थानिक शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना लेखी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथे लसीकरण दरम्यान साडेतीन वर्षाच्या बालकाचा झालेला मृत्यू

**(६१) * १०६२८४ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील डॉक्टरांच्या दुर्लक्षपणामुळे लसीकरण दरम्यान साडेतीन वर्षाच्या हर्षल या बालकाचा सरकारी रुग्णालयात मृत्यू झाल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत राष्ट्रीय मानवाधिकारी आयोगाने जाधव कुटुंबियांना ३ लाख रुपये नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाला निदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आयोगाने दिलेल्या आदेशानुसार शासनाने जाधव कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्यासह या बालकाला लस देण्यापूर्वी त्याची लसीकरण पूर्व चाचणी न करणाऱ्या डॉक्टरांवर कारावाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे. कु.हर्षल चिंतामणी जाधव या बालकाचा मृत्यु दिनांक २१/११/२०१३ रोजी झाला तथापि सदर मृत्यु लसीकरणामूळे तसेच डॉक्टरांच्या हलगर्जीपणामूळे झालेला नाही.
(२) व (३) हे खरे नाही.

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने कु.जाधव याच्या कुटूंबियांना ३ लाख रुपये नुकसान भरपाई का देण्यात येऊ नये याबाबत विचारणा केली आहे.

कु.हर्षल जाधव याच्या मृत्युप्रकरणी जिल्हास्तरीय AEFI समिती,राज्यस्तरीय AEFI समिती व राष्ट्रीयस्तरीय AEFI समिती यांनी दिलेल्या अहवालानूसार बाळाचा मृत्यु लसीकरणामूळे झालेला नाही.त्यामूळे जाधव कुटूंबियांना ३ लाख रुपयांची मदत अनुज्ञेय नसल्याबाबत राष्ट्रीय मानवाधिकार आयोगास अहवाल सादर करण्यात आलेला आहे. त्यामूळे यासंदर्भात लसीकरण पूर्व चाचणी न करणा-या डॉक्टरांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कार्जिडा (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील जामदा धरण प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(६२) * १०६०६९ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कार्जिडा (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील जामदा धरण प्रकल्पाचे काम गेल्या अनेक वर्षापासून स्थानिक ग्रामस्थांचा तीव्र विरोध असल्यामुळे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकल्पाकरिता स्थानिक ग्रामस्थांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या होत्या येथील स्थानिक शेतकऱ्यांनी प्रकल्प होत नसेल तर तो रद्द करुन जमिनीवरील निर्बंध उठवा व शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी परत द्या अशी मागणी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शेतकऱ्यांच्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) होय.

(३) प्रकल्पावर माहे डिसेंबर २०१७ अखेर रू. ३१९.९१ कोटी इतका खर्च झाला आहे. प्रकल्पाअभावी ३५०० हे. सिंचन क्षेत्र वंचित होणार असल्याने शेतकऱ्यांच्या मागणीनुसार प्रकल्प रद्द करता येणार नाही. प्रकल्पाची लाच लुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी सुरु असल्याने सद्य:स्थितीत चौकशीमुळे प्रकल्पाचे मंदावलेले काम चौकशी पूर्ण झाल्यावर व धरणाची चालू निविदा विखंडनानंतर प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोराटी (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) परीसरातील तलावाचे काम पुर्ण करण्यासह शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत

**(६३) * ११०७६० डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोराटी (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) परीसरातील लघुप्रकल्पांतर्गत नविन तलावाचे काम २ वर्षा पूर्वी मंजूर करण्यात आले असतानाही आजपर्यंत तलावाचे काम पूर्ण करण्यात आले नसल्याचे दिनांक २० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच या परिसरातील नागरीकांनी दिलेल्या निवेदनावरून ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी तलावाकरीता संपादीत केल्या त्याचा मोबदला मिळणे अद्याप बाकी असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार बोराटी येथील तलावाचे काम पूर्ण करण्याबाबत व या तलावाकरीता संपादीत केलेल्या जमिनीचा मोबदला संबंधित शेतकऱ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय अंशत: खरे आहे.

(२) व (३) होय खरे आहे.

(४) भुसंपादनासाठी एकुण रु. १९१.०८ लक्ष ची मागणी असुन पैकी रु. ३३.५५ लक्ष महसूल विभागाकडे भरणा केले आहेत. उर्वरीत रु. १५७.५३ लक्ष ची तरतुद सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावात केली आहे. सुधारीत प्रशासकीय मान्यते नंतर मोबदला बाधित शेतकऱ्यांना अदा करण्यात येणार आहे. विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम ३१ मार्च २०१७ पासुन बंद झाल्याने सदर योजना महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ यांचेकडे दिनांक १३/०९/२०१७ रोजी अंमलबजावणी साठी वर्ग करण्यात आली आहे व त्यानुसार योजना पुर्ण करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भुसावळ (जि.जळगाव) शहरातील पाणी टंचाईबाबत

**(६४) * १०४७५५ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा आणि रेल्वेच्या थकबाकीच्या वादात हतनूर धरणातून सुटणारे आवर्तन रखडल्याने भुसावळ (जि.जळगाव) शहरातील १ लाख ८७ हजार नागरिकांना दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजीपासून ८ दिवस पाणी टंचाईचा सामना करावा लागला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भुसावळ नगरपालिकेची कोणतीही थकबाकी नसताना भुसावळ शहरात झालेल्या पाणी टंचाईच्या कारणामुळे नागरिकांनी रास्ता रोको केला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने भुसावळ नगरपालिकेचे पाणी बंद करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

(२) भुसावळ नगरपालिकेकडे आज रोजी ७९.९८ लक्ष एवढी थकबाकी आहे. नगरपालिकेची बिगर सिंचनाची पाणीपट्टी ही मध्य रेल्वे, भुसावळ यांच्याकडून अदा होणाऱ्या पाणीपट्टी रकमेसमवेत आकारल्या जाणाऱ्या स्थानिक उपकराच्या रक्कमेतून नगरपालिकेच्या संमतीने वसुली करण्यांत येते व भुसावळ शहर नागरीकांनी रास्ता रोको केले हे जलसंपदा विभागास अवगत नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील माता रमाई बचतगटाचे तीन कोटींचे मानधन थकल्याबाबत

**(६५) * १०९००७ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील अंगणवाडी व बालवाडीच्या मुलांना पोषण आहार शिजवून देणाऱ्यांना 'माता रमाई' या बचतगटाच्या महिलांचे गेल्या आठ महिन्यांपासून सुमारे तीन कोटींचे मानधन अद्यापही देण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याबाबत धोरणे राबवित असताना तालुक्यातील हजारो अंगणवाड्यात काम करणाऱ्या महिलांना अगोदरच कमी प्रमाणात मिळत असलेले मानधन वेळेवर मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार उक्त बचतगटाचे मानधन तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशतः खरे आहे.

दापोली तालुक्यातील माता रमाई या बचतगटाचे गेल्या आठ महिन्यापासूनचे पोषण आहाराच्या बीलाची रक्कम रुपये ६२.०० लाख थकीत होती. माहे जानेवारी, २०१८ मध्ये अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

माहे डिसेंबर, २०१७ पर्यंत देयक अदा करण्यात आली आहे.

(२) अंगणवाडी सेविका/ मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांच्या मानधनात वाढ करणे भाऊबीज भेट रक्कमेत वाढ करणेबाबतचा शासन निर्णय दिनांक २३.०२.२०१८ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. तसेच सेविकांचे मानधन PFMS प्रणालीत अदा करण्याच्या सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजा अजनी (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) येथील साठवण तलावाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(६६) * १०८७२७ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.रणजीत कांबळे (देवळी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा अजनी (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) येथील साठवण तलावाचे काम सन २०१६ पासून बंद असून अपूर्ण कामाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास संबंधीत विभागाला लेखी निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रातील मुख्य नदीवरील अजनी-दहिगाव या रस्त्यावरील पूलाचे बांधकाम अद्याप सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर साठवण तलावाचे व उक्त पुलाचे प्रलंबीत काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) व (२) होय.
(३) धरणाचे सांडव्याचे काम सुरु करण्यात आले असून पुलाचे बांधकाम करणे हे काम निविदा प्रक्रियेत आहे. सदर योजनेचे सुधारित प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकाची तपासणी मुख्य अभियंता, पुणे यांचे स्तरावर करण्यात येत आहे
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उमरी-गणोरी-बाभुळगांव (जि.यवतमाळ) या रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत

**(६७) * ११२५६४ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरी-गणोरी-बाभुळगांव (ता.बाभुळगांव, जि.यवतमाळ) या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम सन २०१५ मध्ये मंजुर झाले असून त्यामधील उमरी ते गणोरी या टप्प्यातील रस्त्याचे काम करण्यात आले परंतु गणोरी ते बाभुळगांव पर्यंतच्या रस्त्याचे काम अद्याप अपुर्ण असुन रस्त्याच्या काही भागात गिटटी टाकली असल्यामुळे नागरीकांना प्रवास करणे गैरसोयीचे झाले असल्याचे दिनांक २३ डिसेंबर, २०१७ रोजी व त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार गणोरी ते बाभुळगांव या टप्प्यातील रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
सदर कामाचे कार्यारंभ आदेश दि.१८.०६.२०१४ ला देण्यात आले आहेत.
(२) होय.
(३) कंत्राटदाराने काम पुर्ण न केल्यामुळे करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार रस्त्याचे काम कंत्राटदाराकडुन काढून घेण्यात येत आहे. उर्वरीत कामाची निवीदा काढुन काम तातडीने पूर्ण करणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुडुक लघु पाटबंधारे (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) राज्यस्तरीय योजना निधी अभावी बंद असल्याबाबत

**(६८) * १११८८३ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुडुक लघु पाटबंधारे योजना (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) या राज्यस्तरीय योजनेचे काम माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये सुरु झाले तथापि निधीच्या उपलब्धतेअभावी ते गत पाच ते सहा महिन्यांपासून बंद असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेसाठी निधी उपलब्ध करुन द्यावा जेणेकरुन तालुक्यासाठी अत्यंत महत्वाची असलेली ही योजना पूर्ण होईल असे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास सचिव, जलसंधारण विभाग, यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने निधी उपलब्ध करुन या योजनेचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

कुडुक लघु पाटबंधारे योजना (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) या योजनेचे काम पावसाळी हंगामामुळे बंद होते ते सद्य:स्थितीत सुरू आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) कुडुक लघु पाटबंधारे योजना (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) या योजनेस मृद व जलसंधारण विभाग शासननिर्णय क्र. नवीन - २०१७/ प्र.क्र २८७/ जल-४, दिनांक २३/०१/२०१८ अन्वये रू. ११००.०० लक्ष निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.